वाचनालय वा.वा.

२७४९

५।३।८८

५७
+ ५०
१०७

२७४९ ५।३।८८
वा.वा.

IRBK-0102149

IRBK-0102149

२७४९ 9131८
वाका

# गड आला पण सिंह गेला !

(ऐतिहासिक कादंबरी)

संक्षिप्त

मूळ लेखक

हरि नारायण आपटे

IRBK-0102149

संक्षिप्तीकरण

जी. कुलकर्णी

IRBK-0102149

र म्य क था प्र का श न, पु णें ३०

प्रकाशक : वा. ग. मेहेंदळे,
रम्यकथा प्रकाशन, ३९२ नारायण पेठ,
कान्हेरे बिल्डिग, पुणें–३०.

संक्षिप्त स्वरूपांतील–
पहिली आवृत्ति : सप्टेंबर १९७५

(पुनर्मुद्रणाचे सर्वाधिकार
प्रकाशकांच्या स्वाधीन)

किंमत ४ रुपये

मुद्रक : वा. ग. मेहेंदळे, जयभारत मुद्रणालय,
५५१ बुधवार पेठ, पुणें २.

# गड आला पण सिंह गेला !

## १

अरवली पर्वताजवळचें गहन अरण्य.

मोठमोठाल्या वृक्षांची विलक्षण दाटी झाल्यानें दुपार होऊनहि सूर्याचा प्रकाश त्या अरण्यांत सर्वत्र प्रवेश करूं शकला नव्हता.

त्या अरण्यांतून शके १५९२, कार्तिक शुद्ध नवमी या दिवशीं एक बैलगाडी चालली होती. त्या गाडीबरोबर चाल-लेला म्हातारा रजपूत चिंताक्रांत दिसत होता.

या बैलगाडीस गाडी म्हणण्यापेक्षां रथ म्हटलें तर विशेष शोभेल. त्या रथावर चारहि बाजूंनीं पडदे सोडलेले होते.

राजसिंह महाराजांची आज्ञा पाळतांना वीरसिंहाचा मोंगलांच्या हातून त्या जंगलांत मृत्यु झाला होता. त्याचें प्रेत नेणें अशक्य झाल्यानें त्याला त्या जंगलांत अग्नि देण्यांत आला

होता. त्या गाडींत वीरसिंहाची बावीस वर्षाची पत्नी शुभ्र वस्त्र नेसून बसलेली होती. नवऱ्याच्या दु:खानें रडून रडून तिचे डोळे आतां कोरडे झाले होते.

वीरसिंहाला जाळलें होतें ती जागा अखेरीस भिल्लांनीं शोधन काढली. रथांतून ती स्त्री उतरली. तिनें त्या राखेच्या ढिगाला वंदन केलें. त्यांतील एक चिमूटभर राख तिनें घेतली. ती आपल्या कपाळाला लावली. तिच्या डोळ्यांतून त्या ढिगावर टप् टप् अश्रू पडूं लागले. देवलदेवीचा तो शोक पाहून वीरसिंहाची पत्नी व तिची मैत्रीण कमलकुमारी म्हणाली, ' देवलदेवी, मी तुला बरोबर आणली, मांजीला येऊं दिलें नाहीं, तें तूं इथं येऊन रडण्यासाठीं कीं माझी लवकर रवानगी करण्यासाठीं ? पिताजी, तुम्हीं आतां उशीर कां करतां ? या भिल्लांना चिता रचण्यासाठीं इंधन आणण्याला कां सांगत नाहीं ?

' या मथुरानाथजी, तुम्ही उपाध्ये आहांत, तुम्हीं मला मंत्र सांगून माझी बोळवण कराल, म्हणून बाबांच्याकडून मीं तुम्हांला मुद्दाम आणलं. आतां कोणी रडूं नका. मला तिकडच्या दर्शनाची अगदीं गर्दी झाली आहे. तुम्ही जों जों उशीर करतां आहां तों तों माझ्या मनाला वेदना होताहेत. त्या वेदना कां होऊ देतां ? चल ऊठ, ऊठ देवल, असा आळस का करतेस ?'

कमलकुमारी ही संग्रामसिंहाची एकुलती एक मुलगी. ती त्यानें मेवाडचा राजा राजसिंह याच्या घराण्यांतील वीरसिंह नांवाच्या एका पुरुषास दिली होती. वीरसिंह हा राजसिंहाच्या मर्जीतला असून तो मोंगलाचा मोठा द्वेष्टा. राणा राजसिंह याचे ठिकाणीं त्याची इतकी भक्ति होती.

औरंगजेबाला राजसिंहाचें राजपुतान्यांतील वर्चस्व पाहून फार वैषम्य वाटत असल्यामुळें त्यानें आपले हेर व कांहीं सैन्य मेवाडच्या हद्दीवर नाना ठिकाणीं ठेवून संधि साधेल तेव्हां त्यांच्या राज्यांत शिरकाव करण्याविषयीं त्यांना हुकूम देऊन ठेविले होते.

राजसिंहाच्या मनांत आपल्या राज्यांत या लोकांचा शिरकाव यत्किंचितसुद्धां होऊं देऊ नये, असें असल्यामुळें त्यानें हद्दीवर ठिकठिकाणीं ठाणीं ठेवून तीं चांगल्या शूर अशा रजपुतांच्या ताब्यांत दिलीं होतीं. त्यांत अरवलीच्या वाटांपैकीं एका अत्यंत अवघड अशा जागीं वीरसिंहास ठेविलें होतें.

वीरसिंह त्या ठाण्यावर आला त्यावेळीं त्यानें आपल्या पत्नीस बरोबर आणलें नाहीं. त्याच्या मृत्यूनंतर ती वार्ता आठ दिवसांनीं त्यांना समजली. ती वार्ता ऐकल्याबरोबर कमलकुमारीनें सती जाण्याचा कृतनिश्चय केला.

सती जाण्यास पतीचें शव पाहिजे म्हणून ज्या ठिकाणीं त्याचें दहन झालें त्या ठिकाणीं ती सती जाण्यासाठीं आली होती.

कमलकुमारीच्या प्रिय मैत्रिणीनें म्हणजे देवलदेवीनें आपला शोक आवरला. मथुरानाथजीनें सती जाण्याची सर्व तयारी केली. आपल्या वडिलांना सती जाण्यापूर्वी नमस्कार कर म्हणून त्यानें तिला सांगतांच ती संग्रामसिंहाकडे गेली. त्यांना नमस्कार केला. त्यांना धीर दिला.

आपल्या मैत्रिणीजवळ येऊन ती म्हणाली, 'देवल, तूं आतां पिताजींना आणखीं मांजीला माझ्या जागीं आहेस, तर

आतां त्यांना सांभाळ. माझी आठवण मुळींसुद्धां होऊं देऊं नकोस. यापेक्षां तुलां आतां कांहींसुद्धां मला सांगायचं नाहीं. मथुरानाथजी, तुम्हीं आमचे उपाध्याय, तुम्हांला मी आधीं वंदन करतें. मांजीचें स्मरण करून त्यांना मी नमस्कार करतें. पिताजी, तुम्हांला नमस्कार करतें. आतां आनंदानं निरोप द्या.'

मथुरानाथजी मंत्र म्हणूं लागले. पण मंत्र म्हणतां म्हणतां ते थांबले. पांचपन्नास घोडेस्वार त्यांच्याकडे येतांना त्यांना दिसले.

ते चितेजवळ येऊन उभे राहिले. ते मुसलमान सैनिक होते. उदयभानूनें त्यांना ओळखून तिला सती जाऊं दिलें नाहीं.

सती धर्मांत विघ्न आणणाऱ्या उदयभानुशीं सर्वांनीं सामना दिला, पण त्या पन्नास लोकांपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. लढतां लढतां सर्व मेले. केवळ संग्रामसिंह जखमी होऊन पडला.

उदयभानु हा मेवाडच्या घराण्यांतील दासीपुत्र होता. तो शूर, देखणा, हुशार आणि महत्त्वाकांक्षी होता. कमल-कुमारीशीं विवाह करावा अशी त्याची फार दिवसांची इच्छा होती.

तो मेवाडांत असतांना त्यानें ती इच्छा संग्रामसिंहाजवळ बोलून दाखविली होती. त्यावेळीं संग्रामसिंहानें त्याची हेटाळणी करून त्याला उत्तर दिलें, 'हंसाची कन्या हंसकुलांतच दिली जाईल. कावळ्यानें कितीहि आपले पंख चुन्यांत बुडवून पांढरे

करण्याचा प्रयत्न केला, तरी त्याला हंसी मिळणार नाहीं.'

उदयसिंहाचा बाप व वीरसिंहाचा बाप हे सख्खे बंधू होत. वीरसिंह आणि उदयभानु यांचीं वयें जवळजवळ सारखींच. दोघांचें शिक्षण एकाच वेळीं झालेलें. परंतु पुढें राजदरबारीं जाण्याच्या वेळीं वीरसिंह अस्सल क्षत्रिय म्हणून त्यास मानकऱ्याची पदवी तेव्हांच मिळाली.

मानहानि झालेला उदयभानु औरंगजेबाकडे गेला आणि त्यानें मुसलमानी धर्म स्वीकारल्यामुळें, तो त्याच्या अत्यंत मर्जींतील सरदारांपैकीं एक झाला.

शिवाजी महाराज दिल्लीहून गुप्तपणें पळून गेल्यामुळें बादशहास इतकें वाईट वाटलें कीं, कोणी प्रत्यक्ष त्याची दाढी उपटली असती तरीसुद्धां त्यास इतकें वाईट वाटलें नसतें.

दक्षिणेंत पाठविलेल्या जसवंतसिंग व शाहजादा यांच्यावर नजर ठेवण्यासाठीं त्यानें उदयभानूला नेमलें. त्याच्याबरोबर एक हजार राजपूत सैन्य दिलें. जसवंतसिंग व शाहजादा यांच्यासाठीं आणखी तीन हजार लोक त्याच्या बरोबर दिले. त्यास कोंडाण्याचा किल्लेदार करून त्यानें त्याला दक्षिणेस जाण्याचा हुकूम दिला.

दक्षिणची सुभेदारी आणि जोधपूरचें राज्य मिळविण्याचें मनोराज्य मनांत करीत उदयभानु दक्षिणेकडे जायला निघाला. आपल्या वैभवाचें प्रदर्शन करण्यासाठी त्यानें मुद्दाम अरवलीचा रस्ता धरला आणि या प्रवासांत मनी जाणारी कमलकुमारी त्याला दिसली.

बादशहाला सर्व हकीकत निवेदन करून आपण मेवाड-

मध्यें कसा पराक्रम केला हें सांगून त्याच्याकडून कमल-कुमारीशीं विवाह करण्याची परवानगी घ्यावी या विचारानें तो दिल्लीकडे निघतेवेळीं जखमी संग्रामसिंहाला म्हणाला, 'ज्यावेळीं मी या कमलकुमारीला मागणी घालायला आलों, त्यावेळीं आपण काय दुरुत्तरें केलीं ?

'माझी आई दासी होती हा माझा दोष नव्हे, पण त्या दोषामुळं मी कावळा झालों ! आतां पारडं बदललं.

'तेव्हां पूर्वी जी हंसी मला तुम्ही देत नाहीं म्हणून साफ सांगितलंत तीच आज तुमच्यासुद्धां माझ्या तावडींत सांपडल्या-बरोबर मी क्षत्रिय, मी रजपूत ! मामा ! सांगतों ऐका, मी आतां रजपूत नाहीं, मी मुसलमान झालों आहें आणि या कमलकुमारीबरोबर बादशहाच्या समक्ष निका लावून हिला मी आपल्याबरोबर दक्षिणेंत कोंडाणा किल्ल्यावर घेऊन जाणार, समजलांत !'

० ० ०

# २

थोड्या वेळानंतर डोल्या आल्या. त्या तीन डोल्यांत संग्रामसिंह, कमलकुमारी व देवलदेवी या तिघांनीं बसावें, असें

उदयभानूनें ठरविलें. परंतु देवलदेवी कांहीं केल्या ऐकेना. ती म्हणे 'आम्ही दोघी ज्या रथांत आलों, त्या रथांत संग्रामसिंहजीलाहि ठेवून आम्हीं दोघी बसूं; त्यांच्याजवळ आम्ही दोघी असल्याशिवाय चालावयाचं नाहीं.' उदयभानूनें पाहिलें कीं, या कामांत आपण दुराग्रह करूं नये. तेव्हां या चकमकीच्या वेळीं उधळून गेलेले बैल पकडून आणण्यास त्यानें माणसें पाठविलीं.

ती जोडी मोठ्या मिनतवारीनें पकडून आणून रथ जोडून देवलदेवीच्या इच्छेप्रमाणें आंत संग्रामसिंहजीस ठेवलें आणि मग त्या दोघी आंत चढून दाटीवाटीनें कशातरी बसल्या.

थोड्याच वेळांत कैद्यांची गाडी मध्यभागीं घालून ती मंडळी निघाली. उदयभानु आपल्या छावणींत आला व आपल्या हाताखालच्या सेनापतीला कांहीं हुकूम देऊन बरोबर निवडक ४०-५० स्वार, तीन डोल्या व ती बैलगाडी इतका लवाजमा घेऊन दिल्लीकडे चालला.

दिल्लीस परत जाण्याचे वेळीं आतां सबंध सैन्य असणें म्हणजे फारच मूर्खपणा होईल, आपण उभ्या उभ्या जाऊन सरळपणें बादशहास हकीकत सांगून त्याचा हुकूम घेऊन परत दक्षिणेंत जावें असा त्याचा बेत; त्याप्रमाणें त्यानें आपल्या छावणींत येण्याबरोबर आपल्या दुय्यमास हुकूम दिला. तो असा कीं, आतां उदयपूरच्या प्रांतांतून जाण्याच्या भानगडींत तुम्ही पडूं नये.

झालेला प्रकार उदयपुरास कळल्यावर जर आपण

त्यांच्या तावडींत सांपडलों, तर काय प्रसंग ओढवेल आणि काय नाहीं, कांहींच सांगतां येणार नाहीं. करितां कांहीं रस्ता माघारीं जाऊन नेहमींच्या रस्त्यावर येऊन छावणी देऊन तेथें मी दिल्लीहून येईपर्यंत वाट पहावी, असें सांगून त्यानें दिल्लीची वाट धरली.

मध्येंच संग्रामसिंहाला कांहीं होऊं नये म्हणून त्यानें त्याच्यासाठीं एक सैन्यांतला वैद्य आपल्यावरोबर घेतला होता. त्या वैद्यानें आपल्याकडून शिकस्त करून संग्रामसिंहाच्या जखमांतून होणारा रक्तस्राव बंद केला, तेव्हां अंमळ त्याच्या जिवाची आशा वाटूं लागली.

मजल दरमजल करीत करीत स्वाऱ्या दिल्लीस येऊन पोहोंचल्या व उदयभानूनें बादशहाकडे आपण कां परत आलों वगैरे निरोप पाठवला.

उदयभानूनें अरवलीच्या वाटेवर झालेल्या चकमकीचें तिखट-मीठ लावून वर्णन केलें. संग्रामसिंहास पकडण्यास आपल्याला चातुर्याची कमाल करावी लागली हें त्यानें बादशहास कथन केलें.

बादशहानें कमलकुमारीला व तिच्या बापाला आपल्यासमोर हजर करण्यास उदयभानूस हुकूम दिला. नाइलाजानें त्यानें त्या दोघांस त्याच्यापुढें उभें केलें.

बादशहाला न घाबरतां कमलकुमारीनें पातिव्रत्य धर्माची महति त्याच्यापुढें कथन करून तूं मला आपली मुलगी समजून मला सती जाण्यास परवानगी दे असें निवेदन केलें.

तिचें धीटपणाचें बोलणें ऐकून तिच्याबद्दल त्याला कौतुक वाटलें. उदयभानु सरळ दक्षिणेंत न जातां त्यानें बादशहाचा हुकूम मोडला म्हणून तीन महिनेपर्यंत त्यानें कमलकुमारीशीं बोलायचें नाहीं. कोंडाण्यावर गेल्यावर तीन महिन्यांनंतर त्यानें कमलकुमारीशीं लग्न करायचें. त्यानें तसें कांहीं केलें नाहीं तर बादशहानें त्याला ठार मारण्याची धमकी दिली.

तो दिवस कार्तिक वद्य नवमीचा होता. तीन महिने म्हणजे माघ वद्य नवमी. ही गोष्ट उदयभानूच्या मनावर ठसवून त्यानें त्याला निरोप दिला.

मेवाडच्या राजसिंहाला कमलकुमारीच्या कैदेची आणि संग्रामसिंहाबद्दलची माहिती समजली. त्यानें आपला एक विश्वासू माणूस मेवाडहून दिल्लीला पाठवला. तो उदयभानूच्या वाड्याजवळ ज्यावेळीं आला त्यावेळीं बादशहाकडे जाण्यासाठीं पालख्या निघाल्या होत्या.

देवलदेवी पालखींत बसलेल्या कमलकुमारीला निरोप द्यायला आली होती. दाराशीं असलेल्या रजपूत शिपायांच्या गर्दींत मेवाडहून नुकत्याच आलेल्या त्या रजपुतास तिनें ओळखलें.

पालख्या निघून गेल्यावर देवलदेवीनें दारावरच्या माडींत जाऊन एका चिठोऱ्यावर कांहींतरी लिहून त्याची गोळी करून तिनें ती अशा बेतानें फेंकली कीं ती गोळी त्या रजपुताच्या अंगावर पडली.

त्या गोळींत एवढेंच लिहिलें होतें कीं तुम्हीं उद्यां भिका-

ऱ्याचा वेष घेऊन दुपारीं भाकरी मागण्यास या. मी स्वतः भाकरी आणून वाढीन. त्या भाकरींत चिठ्ठी असेल, तीवरून आमची सविस्तर हकीकत आपणांला समजेल.

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं मेवाडचा तो रजपूत बरोबर दुपारीं आला. देवलदेवीनें त्याला भाकरी वाढली.

दुसऱ्या दिवशीं उदयभानु, कमलकुमारी व देवलदेवीस घेऊन दक्षिणेस जाण्यास निघाला.

दक्षिणेकडे जातांजातां कमलकुमारीनें अन्न वर्ज्य केलें. देवलच्या सांगण्यावरून कधींमधीं ती थोडेंफार खाई. पण दिवसेंदिवस ती खंगत चालली.

कमलकुमारीला पाहून उदयभानूच्या पाषाणहृदयासहि अतोनात वाईट वाटलें. आपल्या धास्तीनें हिची अशी दुर्दशा झाली असेल काय, असें एकदम त्याच्या मनास वाटून तो आपल्याशींच कांहीं विचार करीत स्तब्धपणें उभा राहिला.

कमलकुमारीची स्थिति इतकी वाईट झाली होती कीं, केवळ अस्थिपंजर मात्र राहिलें होतें. अंगकांति इतकी फिकी झाली होती कीं, तिच्यापेक्षां निस्तेज व फिकें असें जगांत कांहींसुद्धां नसेल ! अशा स्थितींत तिला पाहिल्यावर त्याचे सगळे कठोर हेतु जागच्याजागीं जिरले तर त्यांत नवल काय ?

आतां आपण सध्यां हिच्या वाटेस मुळींच न जातां जर कांहीं दिवस जाऊं दिले, तरच ही कांहींतरी अंग धरील किंबहुना जिवंत राहील, नाहींपेक्षां ती मध्येंच कोठेंतरी मृत्यु पावणार असें त्यास खास वाटलें.

त्याप्रमाणें वाटल्याबरोबर त्यानें देवलदेवीस असें स्पष्टपणें सांगितलें कीं, 'आजपासून मी तुमच्या वाटेस जाणार नाहीं. इतकंच नव्हेतर माघ वद्य नवमीच्या दिवशीं फक्त कमलकुमारीला एकवार विचारीन कीं, तूं माझ्याशीं विवाह करण्याला तयार आहेस का? ती नाहीं म्हणाली तर नुसतं 'कां नाहीं.' असंसुद्धां न विचारतां तिला राजपुतान्यांत परत पाठवून देईन.

'तिची नीट काळजी घे. तिळतिळ झिजून मरेल असं करूं नकोस. माझ्यानं तिच्याकडे पहावत नाहीं. मी आत्तांच तिला सोडून दिलं असतं, परंतु माझी आशा सुटत नाहीं.' इतकें म्हणून तो तिथून निघून गेला.

देवलदेवी सहज कामासाठीं डेऱ्याच्या तोंडाजवळ आली. पहारेकऱ्यांपैकीं एका माणसावर तिची दृष्टि गेली. त्याला पाहून ती थबकली. तिच्या चेहऱ्यावर आश्चर्य आणि आनंद निर्माण झाला. त्याच्याशीं बोलण्यासाठीं ती बराच वेळ तिथें घोटाळली पण तिचें धाडस झालें नाहीं.

तो पहारेकरी पहारा देतां देतां तंबूच्या तोंडाशी आला. त्यानें आपला जोडा नीट करण्याच्या निमित्तानें जोड्यांतून पाय काढून आंतून एक कागदाची फार लहान घडी दाराच्या फटींतून सारून दिली. झटकन तो पुढें निघून गेला.

तिनें ती चिठ्ठी उघडली, वाचली. ती आनंदली. कमलकुमारीकडे गेली.

ती कमलकुमारीला म्हणाली, 'कमल, आपली खास सुटका होणार. तूं आपला हेका सोडून रोज थोडंतरी खा

म्हणजे तुझा दुबळेपणा जाऊन सुटकेच्या वेळीं तुला चालायची ताकद येईल.'

त्यानंतर देवलदेवीनें कमलकुमारीला त्या चिठ्ठींतील सर्व मजकूर सांगितला. कमलकुमारीला तें ऐकून आनंद झाला. तिनें आपल्या मैत्रिणीचें ऐकायचें ठरविलें.

उदयभानु आपल्या सैन्यानिशीं व कमलकुमारीनिशीं दक्षिणेंत जाऊन पोहोंचला. त्यानें आपल्याबरोबर आणलेला बादशहाचा खलिता जसवंतसिंग व शाहजादा मुआझिम यांजकडे पाठवून दिला. त्यांचें सैन्यहि त्यांजकडे पाठवून दिलें. आपण कोंडाणा किल्ल्यावर जाऊन ठाणें दिलें.

उदयभानूनें हेर पाठवून शिवाजी महाराजांचा व जसवंतसिंगाचा काय संबंध आहे हें काढण्याचा उपक्रम चालविला. हेरांकडून कांहीं वार्ता येण्याअगोदरच त्यानें बादशहास जसवंतसिंग व मोआझिम यांचा आंतून संबंध आहे असें खोटेंच कळविलें. या दोघांची शिवाजीला आंतून फूस आहे व त्यामुळें शिवाजीचें प्रस्थ इतकें माजलें आहे.

शिवाजीचें प्रस्थ वेळींच जेथल्या तेथें जिरवून टाकावयाचें असेल तर त्याला एकच उपाय म्हणजे जसवंतसिंगास येथून काढून नेणें हा होय.

असें खलित्यांत लिहून उदयभानूनें पुढें लिहिलें, "मी आपल्या चरणाच्या आज्ञेप्रमाणें कोंडाण्यावर येऊन राहिलों आहें. आतां त्या किल्ल्याची आपणांस मुळींच भीति नको. शिवाजीनें हा किल्ला घेण्याचें आतां स्वप्नांतसुद्धां आणूं नये

आणि मी गडावर आल्यापासून तेथल्या कोळ्यांवर वगैरे जबरदस्त दरारा बसवून टाकला आहे.

सर्व बंदोबस्त ठीक आहे, परंतु या एका किल्ल्याचा बंदोवस्त उत्तम प्रकारानें ठेवून उपयोग काय? सगळ्या दक्षिणेंत हा पुंड शिवाजी वाटेल तशी पुंडाई करतो आहे आणि त्याला जसवंतसिंगाचें चांगलें सहाय्य आहे. अशा स्थितींत किल्ला आपल्या कबजांत वाळगून उपयोग काय होणार?

वादशहाची आज्ञा होईल तर हा बंदा एका महिन्या–दीड महिन्यांत या हिकमती शिवाजीच्या हिकमतींचा फडशा करून त्याला कैद करून आपल्या चरणांपाशीं घेऊन येईल. इकडे येऊन एकंदर व्यवस्था पाहिली व मला त्यांत कांहीं अशक्य वाटत नाहीं. मात्र जसवंतसिंगाला येथून तावडतोब उत्तरेकडे नेलें पाहिजे. मग शाहजाद्यांना माझ्या हाताखालीं ठेवलें म्हणजे त्यांचें मन मी केव्हांच सुधारून घेऊन आपल्या चरणीं नेहमीं प्रेमभावानें राहतील असें खचित करूं शकेन.

आपल्या विरुद्ध होऊन मराठ्या गनिमाशीं सलोखा करण्यांत कांहींसुद्धां त्यांस वावगें वाटत नाहीं यांचें कारण केवळ जसवंतसिंग होय. हुकूम येईल त्या हुकुमाचा तावेदार आहें. सध्यां या कोंडाण्याच्या राखणीस राहिलों आहें. ही थैली मुद्दाम सांडणीस्वाराबरोवर पाठविली आहे."

अशी थैली पाठवून आतां पुढें काय होतें तें पहात व माघ वद्य नवमीस अजून किती दिवस आहेत ते मोजीत उदयभानु कोंडाण्यावर राहिला.

० ० ०

# ३

कोंकणांतील उमराठे गांवीं माघ शुद्ध नवमीच्या दिवशीं अगदीं गर्दी उडून गेली होती. सुभेदार तानाजी मालुसरे हल्लीं गांवांतच असल्यानें आसपासच्या गांवची मंडळीहि तेथें आली होती. सुभेदाराबरोबर वरेच शिलेदार आणि बारगीर होते, यामुळें लहानशी छावणीच सध्यां उमराठे गांवांत पडली होती.

आज तर तानाजीच्या घराशीं सगळा गांवच लोटला होता. प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

सुभेदार तानाजी पोषाख घालून, घोड्यावर स्वार होऊन आपली भालाबरची सरसावून दुसऱ्या एका त्याच्या-प्रमाणें घोड्यावर स्वार होत असलेल्या अत्यंत वृद्ध मनुष्याशीं कांहीं बोलत होते. त्यांच्या पलीकडे एक सुमारें आठ वर्षांचा मुलगा तानाजीप्रमाणेंच अगदीं हुबेहूब पोषाख करून त्याच्या-प्रमाणें आपलीं लहान लहान हत्यारें सरसावून ऐटीनें एका लहानशा घोड्यावर स्वार होण्यासाठीं धडपड करीत होता. मुलाच्या चेहऱ्याकडे पाहिलें कीं पुरे, हे बापलेक आहेत हें

शब्दांनीं सांगण्याची मुळींच जरुरी रहात नसे. रायबा हें त्या छोटेखानी सरदाराचें नांव !

तानाजीची आई रायबाजवळ जाऊन त्याच्या तोंडावरून हात फिरवून त्याला म्हणाली, 'पुरे नाहीं का झाली अजून हौस पुरेशी ! आतां उतर खालीं. तिकडे महाराजांकडे गेलांत तर महाराज आत्तांच तुमचें शौर्य पाहून तुम्हांला मोहिमेवर पाठवतील !'

'मग मी कांहीं लढाई मारणार नाही काय? महाराजांनीं त्या अफझुलखानाला मारला तस्सा अगदीं मी कोणातरी खानाला मारील.' असें म्हणून त्या गुलामानें आपल्या कमरेच्या तलवारीस हात घातला.

त्याचा तो आवेश पाहून अनेकांना त्याचें कौतुक वाटलें. कांहीं म्हाताऱ्यांच्या डोळ्यांतून तर आंसू आले.

रायबानें तानाजीबरोबर आणि शेलारमामाबरोबर येण्याचा हट्ट धरला. अखेर त्यालाहि बरोबर घेण्यांत आलें. आपल्या गांवच्या तानाजीच्या इथें महाराज लग्नाला येणार ही भूमका उठल्याबरोबर जो तो अतोनात आनंदला. महाराज आले असतां आपल्या घराला कसें सजवायचें, गुढ्या-तोरणें कशीं उभारावयाचीं याबद्दल सगळे लोक विचार करूं लागले. शिवाजी महाराज म्हणजे प्रत्यक्ष शिवाचा अवतार. मोंगलांपासून देशाला फार त्रास झाल्यामुळें या त्रासापासून गरीबगुरिबांना सोडविण्यासाठीं प्रत्यक्ष शंकरच त्यांच्या रूपानें पृथ्वीतलावर अवतरले असें ज्याला त्याला वाटे.

सकाळीं उठल्यापासून तों रात्रीं निजेपर्यंत उमराठ्याच्या

मंडळींना महाराजांचा नुसता निदिध्यास लागून राहिला होता. आजूबाजूच्या सुमारें तीस–चाळीस कोस प्रांतांत महाराजांच्या आगमनाची आनंदवार्ता पसरल्यापासून तेथल्या लोकांनींहि महाराजांस पहाण्यास येण्याचे बेत चालविले.

तानाजी, शेलारमामा, रायबा हे गांवांतून लोकांचा निरोप घेऊन निघाले. महाराजांना रायबाच्या लग्नाचें निमंत्रण देण्यासाठीं ते निघाले होते. त्यांच्यामागून सुमारें दहा शिलेदार व चाळीस बारगीर चालले होते.

शेलारमामा सुमारें ऐंशी. वर्षांचा, तानाजी सुमारें चाळीस वर्षांचा व रायबा सुमारें आठ वर्षांचा. वार्धक्य, तारुण्य आणि बाल्य या तीन अवस्था जणूं काय त्या वेळीं मनुष्यरूप घेऊन तेथून चालल्या होत्या !

रायबा लहान, त्यास एकदम रायगडपर्यंतची मजल व्हायची नाहीं म्हणून त्यांनीं वाटेंत तीन मुक्काम करण्याचें ठरविलें.

थंडीचे दिवस; परंतु कोकणांत त्या प्रांतीं तशी थंडी नसते. त्यांतून ही मंडळी निघाली ती चांगली दिवस उगवल्या-वर निघालेली. यामुळें कांहीं वेळानें ऊन कडक होत चाललें तेव्हां उन्हाचा त्रास होऊं लागला.

शेलारमामा आणि तानाजी यांना त्या उन्हाचें कांहींच वाटत नव्हतें. प्रसंगीं तसल्या उन्हांतच ते पंचवीस कोससुद्धां गेले असते; परंतु बरोबर त्या पोराला घेतलें होतें. तेव्हां अर्थातच त्यांना तितकी दांडगाई करतां येईना. यामुळें धीरे धीरेच स्वाऱ्या चालल्या. मजेदार छाया कोठें दिसली कीं

तेथें जरा उतरावें, रायबाला कांहीं खावयाला द्यावें, त्याची थट्टा करावी, मौजेनें वेळ घालवावा आणि पुढें चालावें. असें करीत करीत घाट वगैरे चढून ती तीन मंडळी आपल्या लवाजम्यासकट रायगडाजवळ येऊन थबकली.

शिवाजीराजे त्यावेळीं रायगडास होते; आणि कर्मधर्मसंयोगानें त्यांच्या मातुःश्रीहि प्रतापगडाहून येथेंच आलेल्या होत्या. गडाच्या पायथ्याशीं मंडळी आली तेव्हांच ही बातमी त्यांना समजली, त्यामुळें शेलारमामास विशेष आनंद झाला.

गडाच्या पायथ्याशीं येतांच त्यांनीं रीतीप्रमाणें वर वर्दी पोहोंचविली आणि हळूहळू ते गड चढूं लागले. शिवाजीराजे यावेळी काय उद्योगांत असतील, आणि आपण जाऊन पोहों-चतांक्षणीं आपल्याला काय म्हणतील, याविषयीं तर्कवितर्क तानाजीच्या मनांत चालले होते.

रायबाला गड चढणें अशक्य, निदान इतकी मजल मारून आल्यावर त्याला चढूं देणें वाजवी नाहीं, म्हणून त्याला एका गड्याच्या खांद्यावर बसवून चालविला होता. तो इतका उत्सुक झाला होता कीं, तो गडी आणि आपले वडील व आजोबा यांच्यापेक्षां चौपट वेगानें चालून एकदम महाराजांच्या पुढें जाऊन उभें रहावें असेंच त्याला वाटत होतें.

होतां होतां मंडळी वर गेली. महाराज सदरेलाच बसलेले होते. तानाजी आले आहेत अशी वर्दी चोपदारानें देतांच त्यांनीं त्यांना तावडतोब येण्याबद्दल सूचना पाठविली आणि लागलीच ती मंडळी महाराजांच्या पुढें येऊन उभी राहिली.

शेलारमामा अगदीं लवून रामराम करावयाला वांकणार

तोंच शिवाजी महाराज आपण होऊन उठले व त्यांनीं एकदम शेलारमामाचा हात धरून म्हटलें, 'मामासाहेब, आम्ही राजे झालों तरी तुम्हांला नाहीं हो राजे ! इतरांना राजे. तुम्हांला आम्ही आपले लहान, तुमच्या मुलासारखे. आपल्या आशीर्वादानं तर आम्ही या थोर पदवीला येऊन पोहोंचलों. असे बसा या इथं गादीवर'

असें म्हणून शेलारमामास त्यांनीं आपल्या उजव्या बाजूस बसविलें. तो आदर पाहून त्या वृद्ध मामास अतिशय आनंद झाला व एकदम प्रेमाश्रु येऊन त्यानें त्या प्रेमाच्या भरांत महाराजांच्या पाठीवर शाबासकी दिल्याप्रमाणें हात मारून म्हटलें, 'शिवाजीराजा, आम्हांसारखी गरीब माणसं, केवळ वृद्ध म्हणून तूं आमचा इतका आदर करतोस तेव्हां तुला कधींसुद्धां कुठं अपेश यायचं नाहीं. देशांतल्या म्हाताऱ्या लोकांचे आशीर्वाद ज्याला मिळतील त्याला अपेश शिवायचंसुद्धां नाहीं.

'मी तुला आंवतण द्यायला आलों आहें. रायबा, ये. महाराजांना दंडवत घाल. हा तुझ्या तानाजीचा मुलगा. जानकीअक्कानं याचं लगीन काढलं आहे. लगीन धरलं आहे या महिन्यांत, काळोख्या पंधरवड्यांत नवमीचं. तर तुला आलं पाहिजे. चार दिवस मांडवशोभा केली पाहिजे. गरिबाचं घर म्हणून नाहीं म्हणूं नको'

शेलारमामा हें बोलत असतां रायबानें महाराजांना दंडवत घातले. त्याची ती गोजिरवाणी मूर्ति पाहून शिवाजी महाराजांस फार कौतुक वाटलें. आणि त्यांनीं त्यास एकदम आपल्याजवळ ओढून घेऊन म्हटलें, 'अरे वा ! हे आमचे छोटे

सुभेदार काय ? काय हो, तुम्ही आपल्या लग्नाचं आमंत्रण आपणच द्यायला आलांत का ? पाहूं पाहूं, तुमची तलवार पाहूं !' असें म्हणून महाराजांनीं त्याच्या तलवारीस हात लावला.

त्याबरोबर रायबाच्या मनास काय वाटलें, तो एकदम म्हणतो, ' महाराज, मला एक खरी तलवार द्या हो, म्हणजे मीं बाबांबरोबर जाऊन मोंगलांशीं लढाई करीन. '

' हं हं ! अरे वा ! मग आम्ही तुम्हांला छोटे सुभेदार म्हटलं तें उगीच का ? काय तानाजीराव, ही स्वारी तर तुमच्याहून सवाई शूर होणार असं दिसतं. आतां लग्न काढलं आहेत ना त्याचं ? काल आईसाहेबसुद्धां तुमची आठवण काढीत होत्या. '

' सरकार, आईसाहेब आणखी आपण हुकूम फर्मावाल तेव्हां मी अगदीं हजर ! आतां या घटकेला कांहीं हुकूम असला तर सांगावा. '

' या घटकेला आतां हुकूम एवढाच कीं, तुम्ही आतां स्नानापानाच्या तयारीला लागा. तुमचं जेवण वगैरे झालं म्हणजे मग बोलूं आपण. आंत आईसाहेबांना वर्दी पोहोंचविली का रे कुणी ?'

महाराज एकीकडे असें बोलत व एकीकडे त्या मुलाला कांहीं विचारीत आहेत तों ' एक हेजीब कांहीं महत्वाचं काम घेऊन आला आहे, भेटूं इच्छितों ' असा चिटणिसाकडून निरोप आला तेव्हां महाराज लगबगीनें आपल्या खास महालांतील एकान्तांत बसण्याच्या खोलींत गेले.

० ० ०

# ४

तानाजी, शेलारमामा वगैरेंचें स्नान–भोजन झालें तरी महाराज आपल्या एकांत महालांतून बाहेर येईनात, हें पाहून सर्व मंडळींस फार अचंबा वाटला. महाराजांच्या अंगचा मोठा गुण हा कीं, ते जेवणाखाण्याच्या कामांत आपल्या हाता-खालच्या लोकांबद्दल अतिशय काळजी वाहत.

कोठें मोहिमेवर गेले असले तरी जेथें तळ पडेल तेथें पहिल्याप्रथम एकवार छावणीभर हिंडून प्रत्येक शिलेदार, बार-गीर, एकंडचा किंवा बाजारबुणग्यांची जेवणाखाणाची सोय लागली कीं नाहीं हें पहावयाचे आणि नंतर मग आपण आपल्या स्वतःच्या जेवणाखाणाच्या चौकशीस लागावयाचे.

या बारीक नजरेमुळें त्यांच्यावर प्रत्येकाचें प्रेम बसलें होतें.

महाराज आपल्या एकांत महालांतून इकडे येण्यास निघाल्याची वर्दी आली आणि महाराज येऊन पोंचतात तों तानाजी व शेलारमामा यांचें जेवण संपलेंहि होतें. तें पहाताच महाराजास थोडेसें आश्चर्य वाटलेसें दिसलें. ते तानाजीस आणि

शेलारमामास म्हणतात, ‘ वा ! आम्हांला थोडासा उशीर झाला म्हणून आपण जेवणसुद्धां नीटपणें जेवलां नाहीं. आमची चूक खरी त्यांत; पण मामासाहेब, आपण आमचा लेकरांचा समाचार घ्यायचा का आम्हीं आपला समाचार घ्यायला आलों नाहीं म्हणून आपण रागावून लवकर लवकर जेवण आटपायचं ?

‘ घर कुणाचें आहे ? आपल्या घरांत आपला समाचार आपण घेणार ! अन् आईसाहेब होत्याच ना इथं ? शिवाय मासाहेब, आज तानाजी इथं आला आहे, तो तर आमचाच आहे, तुमचा नाहीं. त्यानं तुमचा समाचार घेतला पाहिजे. आईसाहेब, जेवले का हे नीटपणे ? काय हो छोटे सुभेदार, तुमचं कसं काय ? तुम्हीं आतां आमच्याबरोबर मोहिमेवर येणार ?’

‘ महाराज, मोहिमेवर नेत असलां, तर आधीं मोहिमेवर येणार. ’ रायबा आपल्या ऐटीनें म्हणाला.

शेलारमामा मधेंच म्हणतात, ‘ महाराज, त्याची वटवट कधीं संपायची नाहीं. आपण जें काय बोलाल, त्याच्यावर तो कांहीतरी विचारायचाच. पण महाराज, आमच्या गांवाला आणखीं घराला आपले पाय लागणार ना ? आमची गांवची मंडळी कशी अगदीं टपून बसली आहेत बघा, आपले पाय लागणार म्हणून. ’

‘ हो हो मामासाहेब, आमचे पाय लागण्याची काय गोष्ट सांगतां आपण ! आपण आमंत्रणाला आलां आणखीं मी नाहीं म्हणणं हें कांहीं शोभणार आहे ? पण सध्यांचे दिवस कसे आहेत हें आपण जाणतांच आहां. कोण्यावेळीं काय काम-

गिरीवर जावं लागेल याचा नेम नाहीं.

'औरंगजेब बादशहाचा एक क्षणाचासुद्धां भरंवसा नाहीं. या क्षणीं जें बोलेल, त्याच्या अगदीं उलट कृति त्याच्या पुढच्या क्षणीं करील त्याचा पोरगा, आणखीं तो जसवंतसिंग हे जरी आम्हांला मिलाफ दाखवितात खरे, पण त्यांचा काय नेम सांगावा ?

'ठीक आहे. आपण आतां थकून भागून आलां आहां. जरा पडा, मग आपण बोलूं याच्यासंबंधानं. तानाजीराव, तुम्हीं पाहिजे तर घटकाभर स्वस्थ पडा.'

तानाजीनें महाराजांचें बोलणें ऐकलें पण त्यांच्या मुखावरील भाव पाहून तो त्यांना हात जोडून म्हणाला, 'सरकार, बोलण्याची माफी असावी. पण हेजीब मघाशीं आला त्यानं कांहींतरी चिंता उपजविणारी बातमी आणली असावी महाराज चिंतेंत असतां तिचं कारण विचारण्याचं सोडून हा तानाजी घटकाभर नाहीं क्षणभर तरी कसा स्वस्थ पडेल ?'

तें तानाजीचें बोलणें ऐकून महाराज किंचित हंसले आणि म्हणाले, 'तानाजी, तुला मी सांगणार नव्हतों, तूं इथून जाईपर्यंत त्यासंबंधीची गोष्टच बाहेर फोडणार नव्हतों, पण तं माझ्या चर्येवरून ताडलंस तेव्हां आतां सांगितल्याख़ेरीज कसं चालणार ?

'आईसाहेब, आपण तिकडे माझ्या दिवाणखान्यांत आलां तर सांगतों. मामा, आपणहि चला. म्हणजे आपण आतां बोलत होतों त्याची आपल्याला प्रचीति दाखवितों.' असें म्हणून महाराज पुढें झाले आणि त्यांच्या मागोमाग तानाजी व

शेलारमामा हे चालले व सगळ्यांच्या मागून जिजाबाईसाहेब आल्या.

खास महालांत येण्याबरोबर भालदार-चोपदारांस बजावून सांगितलें कीं कोणीहि आलें तरी सध्यां कांहीं वेळ नुसती वर्दीसुद्धां द्यावयाची नाहीं. आणखीं बाळाजी आवजींना मात्र इकडे पाठवून द्यावें. त्याप्रमाणें चिटणीस आल्यावर पांचहिजणें बसलीं आणि महाराजांनीं दिल्लीहून आलेला एक कागद काढून चिटणिसांस वाचून दाखविण्यास सांगितला.

जयसिंगाच्या भरीनें व बादशहाच्या दिलखुष पत्रामुळें शिवाजीमहाराज दिल्लीस गेले व बादशहानें तेथें त्यांचा अपमान करून दगलबाजीनें त्यांना नजरकैदेंत ठेवलें.

त्या कैदेंत असतांना शिवाजीमहाराजांच्या गोड स्वभावामुळें व औरंगजेबानें त्याच्याशीं केलेल्या दगलबाजीबद्दल वाटलेल्या तिटकाऱ्यामुळें दरबारच्या पुष्कळ रजपूत व एकदोघां मुसलमान अधिकाऱ्यांचेहि मत शिवाजीमहाराजांस अनुकूल असें झालें होतें. एका दोघांशीं तर फार उत्तम स्नेहहि झाला. या स्नेह्यांपैकीं एका रजपुतानें त्यास रोजच्यारोज बादशहाकडच्या बातम्या पोहोंचवाव्या.

पुढें महाराज दिल्लीहून निघून गेले, तेव्हांपासून तसाच काहीं मजकूर कळविणें असल्यास मुद्दाम एक हेजीब पाठवून तो यास तिकडल्या बातम्या पाठवीत असे. त्याच रजपूत अधिकाऱ्याकडून आज हा हेजीब पत्र घेऊन आला होता.

या पत्रांत औरंगजेबानें ज्या कांहीं हेतूनें उदयभानूला इकडे पाठविलें होतें, तें सर्व लिहून कळविलें होतें. उदयभानु

कोंडाण्यावर येऊन पोहोंचला, त्याच सुमारास हा हेजीब इकडे येऊन पोहोंचावयाचा, परंतु वाटेंत कांहीं दिवस तो थोडासा आजारी पडल्याकारणानें त्यास एका गांवीं मुक्काम करावा लागला.

उदयभानु नांवाचा कोणी मुसलमान झालेला सरदार अगदीं एकाएकीं कोंडाण्यावर येऊन राहिला आहे व त्याच्या-बरोबर दहा–पांच हजार सैन्य आहे असें महाराजांना कळलें असून त्याचा इकडे येण्याचा हेतु काय आणि त्यानें आणखीहि बरेंचसें सैन्य आणलें आहें तें जसवंतसिंगाकडे पोंचतें केलें यांतहि हेतु काय, तें सर्व इत्थंभूत समजण्यासाठीं महाराजांनीं आपल्याहि हेरांना पाठविलें होतें. त्यावरून त्यांना बहुतेक बातमी लागलीच होती. परंतु आजच्याहि या पत्रानें त्यासंबंधीं कांहीं शंकाच ठेवली नाहीं.

बाळाजी आवजीनें तें पत्र वाचून दाखविल्यानंतर कांहीं वेळ महाराज व बाकी सर्व मंडळी बसली होती. तितक्यांत जिजाबाईसाहेब म्हणतात, 'मला वाटलं होतं एकदां हा कोंडाणा आपल्याला घेतला पाहिजे. बाद्शहा पक्का लबाड, म्हणूनच त्यान तो आपल्या ताब्यांत ठेवून घेतला. कीं तो हातीं असला म्हणजे आजूबाजूचा प्रांत जरी शत्रूच्या हातांत असला तरी हरकत नाहीं. वाटेल त्यावेळीं मारा करतां येईल.

'परवांच्या दिवशीं मी अशी उभी होतें, आणखी सहज माझी नजर समोर कोंडाण्यावर गेली. आणखी वाटलं कीं, तुला एकदां सांगावं कीं, हा किल्ला एवढा घेऊन आपलं लष्कर त्यावर ठेव. त्याखेरीज कांहीं आपला बंदोबस्त ठीक-ठाक बसायचा नाहीं.'

'आईसाहेब, आपण म्हणतां त्या गोष्टी खऱ्या, पण आजपर्यंत तह मोडण्याला कांहीं सबब नव्हती. आतां उदय-भानूबरोबर मुद्दाम लष्कर देऊन पाठवलं आहे, तेव्हां आपला हेतु बरा दिसत नाहीं असं म्हणून आपल्याला काय करायचं तें करायला मुळींच हरकत नाहीं. शिवाय या उदयभानूला बादशहानं आपल्यावर नजर ठेवायला म्हणून पाठविला आहे असं या पत्रावरून जसवंतसिंगाला आणखी शहाजाद्याला कळलं म्हणजे ते मुळींच याला मदत करायला यायचे नाहींत हें उघडच आहे.

'बादशहाचा आपल्यावर किती विश्वास आहे तें पहा, म्हणून लिहून मी मुद्दामच हें पत्र त्या दोघांकडे पाठवणार आहें. ते दोघे चार दिवस स्वस्थ बसले म्हणजे माझं काम झालं.

'चार दिवसांनीं हा किल्ला आपल्या हातांत आल्यावर मग त्यांनीं जरी आपल्या विरुद्ध गडबड सुरू केली तरी आपण कांहीं त्यांचं चालू देणार नाहीं. ते बहुतकरून तसे लबाड दिसत नाहींत. बादशहाच्या विरुद्ध आपल्याशीं मिलाफ असावा अशा बुद्धीच्या माणसांपैकीं आहेत. पण न जाणो, आपण आपलं सावधपणानं रहावं. तेव्हां आतां पहिलं काम हा कोंडाणा परत घ्यायचा. तें कसं काय जुळणार तें आतां पहायचं.

'उदयभानु नवीन माणूस आहे. तो येऊन आपली व्यवस्था वगैरे नीट लावून स्वस्थ होण्याच्या आंतच त्याला इथून हांकून दिला पाहिजे. त्याला पक्की व्यवस्था लावण्याला तशी

फुरसत देतां उपयोगी नाहीं, तेव्हां आतां स्वतःच या कामाला पुढं होणार, त्याखेरीज चालायचं नाहीं.'

पण महाराजांच्या या बोलण्यावर तानाजी म्हणाला, 'आपण आहांत तोंवर माझ्यासारखीं लाखों माणसं आपल्याला मिळतील. आपण मला आज्ञा करा. मी जाऊन हा किल्ला सर करून आपल्याला देतों.'

'तानाजीराव, तुम्ही कराल कीं नाहीं याबद्दल मला मुळींच शंका नाहीं. पण तुम्ही आपल्या मुलाचं लगीन काढलं आहे तेव्हां तें कार्य होईपर्यंत आपल्याला मी कांहीं सांगणार नाहीं. किल्ला हस्तगत करून घ्यायचाच तर तो आत्तांच करून घेतला पाहिजे आहे. थांबून उपयोग नाहीं हीहि गोष्ट खरी; पण त्याकरितां मी स्वतःच जाण्याचा निश्चय केला आहे.'

'लगीन ? महाराज, आपल्यासारख्या स्वामींच्या कार्या-पुढं मुलाचं लगीन म्हणजे काय गोष्ट आहे ? सरकार, आधीं कोंडाण्याच लगीन उरकीन, मग रायबाच्या लग्नाला आपल्या-बरोबर जाईन. शेलारमामा, तूं परत जा आणि सूर्याजीला म्हणावं आपलं सगळं लष्कर घेऊन इकडे ये. महाराज, कोंडाणा किल्ला सर करून येईन, मग आतां पुढें काय बोलावयाचं तें बोलेन. पण माफी असेल तर एक विनंति आहे, ऐकून घेतलीच पाहिजे...

'विनंति एवढीच कीं, मी किल्ला सर करेपर्यंत आपण रायगडावरून हलायचं नाहीं. मी आपल्या पायांवर हात ठेवून प्रतिज्ञा करतों कीं, कोंडाणा आजपासून दहा दिवसांच्या आंत घेऊन आपल्या पायांपाशीं येतों.'

शेलारमामानेंहि तानाजीच्या म्हणण्याला होकार भरला. तानाजीनें महाराजांना आणि जिजाईला दंडवत घातले आणि ते दोघे त्यांचा निरोप घेऊन तेथून निघाले.

० ० ०

# ५

कोंडाणा किल्ला पुण्यापासून सात कोसांवर नैॠत्येला आहे. त्याच्या एका अंगाला एक लहानसा गांव आहे. त्याचें नांव कोंडणपूर.

हा मूळचा यादव किंवा शिलाहार यांच्यापूर्वीं कोणीतरी पराक्रमी हिंदु राजानें बांधलेला असावा.

हा किल्ला शिवाजी राजांच्या ताब्यांत बरींच वर्षें होता. शाहिस्तेखानाला मारायचा बेत याच किल्ल्यावर त्यांनीं आंखला होता.

१६६५ सालीं हा किल्ला तहामुळें मोंगलांच्या ताब्यांत गेला. त्यावेळपासून तो गेलीं कांहीं वर्षें मोंगलांकडेच होता. हा किल्ला समुद्रसपाटीपासून ३३०० फूट उंच आहे. या किल्ल्याला पूर्वीं तीन दरवाजे होते.

या किल्ल्याच्या घेरांत कोळी लोकांची वस्ती होती. रायाजी हा या किल्ल्यावरील त्या काळीं असलेला घेरेसर-नाईक हा कोळीच होता.

उदयभानु या किल्ल्यावर औरंगजेबाच्या आज्ञेप्रमाणें येऊन राहिला. त्याला कोणीतरी दगलबाजीनें कमलकुमारीला आपल्या ताब्यांतून पळवून नेईल हें भय सतत वाटत असे.

म्हणून त्यानें किल्ल्यावर आल्याबरोबर घेरेसरनाईक रायाजी याला व डोणजें, कल्याण, कोंडणपूर वगैरे ठिकाणच्या पाटील–कुलकर्ण्यांस आणि मुख्य कोळ्यांस व महार, रामोशी वगैरेस बोलावून आणून असा हुकूम सोडला कीं, ‘ कोणी परकी मनुष्य, मग ती स्त्री असो किंवा एखादें लहान पोर असो, जर किल्ल्याच्या घेऱ्यांत राहणाऱ्या कोणाकडे पाहुणं येत असले तर आधीं किल्ल्यावर माझ्यापर्यंत वर्दी आली पाहिजे.

‘ आणखी माझा लेखी हुकूम मिळाला म्हणजे मग त्याला आंत घ्यावें. हुकुमांत जितके दिवस लिहिले असतील तितकेच दिवस त्यानें रहावें आणि त्या हुकुमाप्रमाणेंच किल्ल्याच्या हद्दीच्या पार माणूस गेल्याबरोबर किल्ल्यावर मजकडे वर्दी यावी. जो मनुष्य जितके दिवस रहायचा असेल तितके दिवस रोज सकाळीं आणि संध्याकाळीं तो आल्या-बद्दलची वर्दीहि आपल्याकडे यावी. या हुकुमाविरुद्ध जो कोणी कोणास किल्ल्याच्या हद्दींत आणील, त्या आणणारास व तो आणील त्यास, दोघांसहि कडेलोट करून मारण्यांत येईल. ’

असा हुकूम दिल्याकारणानें सर्व मंडळी अगदीं घाबरून गेली होती. कोणाहि येणारा–जाणारासंबंधानें ही तजवीज

केली होती. खालीं वाड्यांतून तर गस्तीची तजवीज केलीच होती, परंतु मध्यंतरीं सर्व किल्ल्याच्या सभोंवार जीं बारा मेटी आहेत, त्यावरहि दर मेट्यावर एक एक कोळ्याचा एक एक पहारा असून दर प्रहरांतून निदान तीनदां गस्तीचा शब्द करून आपल्या उजव्या व डाव्या हातच्या मेट्यांवरल्या लोकांचा साद घेतला जावा असा सक्त हुकूम असे.

शिवाय दर मेट्यावरून तीन इसम निघून त्यांनीं आपल्या पलीकडच्या मेट्यावर जावें व गस्त पोंचवावी असें सगळ्या रात्रभर चालत असे. अर्थातच या कोळी लोकांस आतां अगदीं जागृतीनें रहावें लागत असे.

परंतु कोळी लोक तेवढेच या किल्ल्याच्या बाहेरचे रखवालदार नसत. किल्ल्याच्या तटापासून सुमारें दीड पुरुष खोलीवर बाहेरले अंगास सगळ्या किल्ल्याच्या सभोंवार सुमारें चार–पांच हात रुंदीची जागा केलेली होती. या जागीं महार लोकांच्या झोंपड्या असून तेथें त्यांचा पहारा असे. सगळ्यांत जागता पहारा याच लोकांचा आणि त्यांची पहाऱ्याची जागाहि फार बिकट.

उदयभानूनें या सर्व लोकांस एकवार आपल्या समोर बोलावून ताकिदी दिल्या आणि तो स्वत: एकदां ती महारांच्या पहाऱ्याची जागा व कोळ्यांची मेटी आणि तो घेरा हिंडून सर्व स्थिति आपल्या नजरेखालीं घालून आला.

ज्याप्रमाणें किल्ल्याच्या बाहेरची, त्याचप्रमाणें वरचीहि बंदोबस्ती त्यानें केली.

रायाजी घेरेसरनाईक यांचे घरीं त्यांच्या मुलीचें लग्न

निघालें. तेव्हां अर्थातच पुष्कळच वऱ्हाडी जमावयाचे. त्यावेळीं या बाजूच्या मावळच्यांत रायाजीच्या कोळी लोकांचीच वस्ती फार. तो प्रांत त्यांचाच झाला होता असें म्हटलें तरी चालेल, आणि त्यांत घेरेसरनाईक म्हणजे केवढें प्रस्थ !

लग्नाचें वऱ्हाड चार आठ दिवस येणार–जाणार तर त्याला मुभा असावी, अशी विनंति करण्यास रायाजी उदयभानूकडे गेला. पहिल्या सपाट्यास उदयभानूनें त्यास अशी परवानगी दिली जाणार नाहीं असें सांगितलें.

रायाजीला अतोनात वाईट वाटलें. थोडासा रागहि आला, परंतु एकदम रागावून बोलण्यांत कांहीं अर्थ नाहीं, प्रथम सवलतीनें घ्यावें, असें मनांत आणून तो उदयभानूस म्हणाला, ' सरकार, परवानगी देणं न देणं आपल्या मर्जीची गोष्ट आहे, पण आमच्या घरीं कार्य आणखी आमच्या जातवाल्यांनासुद्धां लग्नाला यायला परवानगी नाहीं याचा अर्थ काय ? मूळ सोयरीकच जर पुण्यांतली आहे तर आम्हांला आमच्या सोयऱ्यांना आणखी त्यांच्या सोयऱ्याधायऱ्यांना आंत आणल्याखेरीज कसं चालेल ?

' आपली मर्जी नसली तर चार दिवस आम्हीं सगळे कोळीच बाहेर जातों. लग्नकार्य उरकल्यानंतर येऊं. तोंपर्यंत पहारा आपण सांभाळा. आतां दुसरी गत आम्हांला नाहीं. '

अशा वेळीं आपला बोज राखून त्यांचें मन दुखवायचें नाहीं अशी कांहींतरी युक्ति केली पाहिजे असें त्यास वाटूं लागलें आणि म्हणून तो रायाजीस म्हणतो, ' अरे, तुमचीं लग्नकार्यं इथं होऊं नयेत किंवा तुमचे कोणी जातभाई तुमच्याकडे येऊं नयेत असं कोण तुम्हांला म्हणेल ?

'वाटतील तितकी तुझी मंडळी आण, ने, येऊं दे, जाऊं दे, त्याबद्दल तुला यत्किंचितसुद्धां कांहीं हरकत नाहीं. पण या मंडळींतून कोणी भलताच आपल्या शत्रूचा हेर आंत येऊं देऊं नको. त्याबद्दल काळजी घे म्हणजे झालं! दुसरं काय माझं म्हणणं?'

त्यावर रायाजी म्हणाला, 'आमची विनंति मानली, आतां आम्हांला वघा मूठभर मांस आलं, दुसरं काहींबी नाहीं.'

रायाजीच्या या बोलण्यानें उदयभानूहि खूष झाला व त्यानें त्याला पुन्हां एकदां काळजीपूर्वक वागण्याबद्दल निक्षून सांगून खडकवासलें, डोणजें, कल्याण, कोंडणपूर वगैरे भोंव-तालच्या अधिकाऱ्यांना देण्यासाठीं हुकूम लिहून दिले कीं, 'शिवरात्रीपर्यंत रायाजीच्या घरीं जे कोण लोक येतील त्या लोकांना अगदीं खुशाल येऊं जाऊं द्यावें, कोणत्याहि प्रकारचा अडथळा करूं नये.'

हे हुकूम रायाजीनें आपल्या मेटयावर आल्यावर सर्व अधिकाऱ्यांकडे पाठवून दिले आणि रायाजीच्या सोयऱ्या-धायऱ्यांस येण्या-जाण्याला कोणत्याहि प्रकारें अडथळा होणार नाहीं अशी व्यवस्था झाली.

रायाजीचा व्याही दौलतराव पुण्याचा होता. त्यानें आपल्या व्याह्यास म्हणजे रायाजीस सांगितलें कीं, 'बाकी आपण कार्य केलं, तें फार उत्तमच झालं. आपण आतां गोंधळ घालावयाचा तो आमच्या शिफारशीच्या गोंधळ्याकडून घाल-वावा. आमचा गोंधळी असा छान शाहीर आहे कीं, त्याच्या लावण्या आणि पोवाडे तुम्हीं ऐकले तर त्याला आपल्याजवळ नेहमींच ठेवून घ्यावासा वाटेल.'

रायाजीला आपल्या पिढीजाद गोंधळ्याचा अभिमान होताच. तेव्हां तुमचा गोंधळी चांगला कीं, आमचा चांगला याबद्दल वाद होऊन शेवटीं दोन दिवस दोघांचे गोंधळ व्हावे असें ठरलें.

तोताराम गोंधळ्याचा गोंधळ करण्याचें ठरून त्यास सुपारी देण्याचेंहि ठरलें. त्या काळीं तुळशीदास व अज्ञानदास नांवाचे दोन गोंधळी शाहीर फार नामांकित होते. मोठमोठ्या लोकांच्या घरीं गोंधळ घालण्याचा प्रघात असे.

रायाजीनें आपली संमति देण्याबरोबर दौलतरावानें आपला एक माणूस मुद्दाम पुण्यास पाठवून तोतारामास आपल्या सगळ्या मंडळीनिशीं बोलावूं धाडलें आणि त्याप्रमाणें तोताराम आलाहि.

गोंधळाच्या रात्रीं फारच गर्दी झाली आणि नजीकच्या व लांवच्या मिळून पांच-पन्नास गांवचीं माणसें त्या गोंधळ्याचें गाणें ऐकण्यासाठीं आलीं. गोंधळ्याची तयारी खूपच होती. त्याच्यामागें असणारीं माणसें उभीं राहिलीं. घटाची सामग्री घेऊन घट मांडला. ऊस तीन तिकोनी करून माळ सोडून ती घटावरल्या नारळाच्या शेंडीला भिडेशी लोंवत बांधली. तुण-तुण्याचा कर्णमधुर आवाज निघूं लागला. सवळ्या संबळ कडाक्यानें वाजवूं लागला आणि गोंधळ्यानें पहिल्या प्रथम आपलें नमन करण्यास सुरवात केली. गोंधळ्याचा आवाज खडा पहाडी, परंतु त्यांत म्हणावी तशी गोडी आरंभीं वाटेना. नमन होतांच रीतीप्रमाणें निरनिराळ्या देवतांनीं गोंधळास यावें म्हणून आवाहनास सुरवात झाली.

गोंधळ झाल्यावर कथा झाली. कथा झाल्यावर पोवाडे व लावण्या म्हणण्याचा बूट निघाला. तोताराम खालीं बसला त्यानें आपलें तें तुणतुणें नीट लावलें. एकदोन लहान लहान- फटके झाल्यावर त्यानें खड्या सुरांत पोवाड्याला सुरवात केली.

० ० ०

तोतारामानें शंकर आणि अंबाबाई यांच्या अवताराचा पोवाडा खड्या सुरांत म्हणायला सुरवात केली. दैत्य-असुरांचा देवीनें आणि शंकरानें कसा संहार केला तें सांगून तो म्हणाला—

कलयुगीं हे मोंगल राक्षस ।
केला गाईब्राह्मणांचा सत्यानास ।।
गोरगरिबांचा छळ करिती ।
पतिव्रतांच्या इजती घेती ।
अहो, घरची बाइल ओढून नेती ।
आम्हां टकटका बघाया लाविती ।।
चरचरां गाई धरून कापिती ।
अन् घटघटा आईचं रगात पिती ।।

असें सांगून तोताराम पुढें म्हणाला-

बोले अंबा मग शंकरा ।
तुम्ही जावं हो गड शिवनेरा ।।

तिथं माझी मोठी भक्त ।
जिजा भोसल्याची राहत ।।

घ्या हो तिच्या पोटीं अवतार ।
करा दुष्टांचा संहार ।।

मग घेतला त्रिशूळ पाश ।
मग घेतला त्यानं अंकुश ।।

वाजवि मोठ्यानं डमरं ।
बोलावि आपुलं गण सारं ।।

शिव काय बोलं मग त्यांना ।
चला चला रं कापुं दुष्टांच्या माना ।

मी होतों शिवाजी राणा ।
तुम्ही माझं मावळ जाणा ।।

असें सांगून शिवाजीच्या धर्मकार्याची महति तोतारामनें लोकांना सांगितली-

गाई ब्राह्मणाच्या रक्षणा ।
कराया स्वराज्याची रचना ।
जे जे येतील मजकडं धांवुन ।
त्येचं माझं जमलं भाऊपण ।
पर जे होतील मज बेमान ।
त्येचं माझं पक्कं शत्रुपण ।।

जे जे मोंगलांचे चाकूर ।
थू: रे थू: त्येच्या जिनगानीवर ! ॥
तुम्ही सूर मर्द फिरंगोजी ।
कुठं अभिमान तुमचा ग्येला जी ॥
करिता कुणाची तुम्ही चाकरी ।
करा करा विचार थोडा तरी ॥

गोंधळी जसजशीं आपल्या पोवाड्याचीं कडवीं म्हणत जाई, तसतसें त्याचें अवसान खूपच वाढत चाललें आणि त्याच्या अवसानाच्या संसर्गानेंच जणूं काय तेथें बसून ऐकणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे बाहु स्फुरण पावूं लागले.

श्रोत्यांच्या मनावर ज्या कडव्यांचा विशेष परिणाम व्हावा अशी त्या गोंधळ्याची इच्छा किंवा जीं कडवीं म्हणतांना त्याचा स्वतःचा आवेश फारच वाढे, तीं कडवीं तो अस्तन्या वर सारून आणि मिश्यांवर ताव देऊन म्हणत असे.

होतां होतां जेव्हां तो ' थू: त्येच्या जिनगानीवर ' पालुपदाच्या कडव्यावर येऊन एकामागून एक चरण म्हणून शेवटीं ' थू: त्येच्या जिनगानीवर ' असें अत्यंत आवेशानें म्हणे तेव्हां श्रोतेमंडळींपैकीं बहुतेकांच्या अंगांत वीरश्री चढली. प्रथम जे वेडेवांकडे अघळपघळ बसले होते, ते नीट उठून जरा सांवरून व वीरासनें घालून बसले. हे सर्व कोळी लोक मोंगलांची चाकरी करीत होते खरे ! परंतु बहुतेकांचे मन त्या गोष्टीविषयीं मोठी भक्ति किंवा आस्था वाळगून नव्हते.

पोवाडा संपला त्यावेळीं जो तो त्या तोतारामाकडे टकमकां पाहूं लागला आणि थोड्याच वेळांत ती शांतता

मोडून आपापसांत कुजबूज सुरू झाली. रायाजीचें तर भान अगदींच नाहींसें झालें. दौलतरावाची तीच अवस्था झाली. त्यानें गोंधळ्यास कांहीं खूणहि केली व गोंधळी आतां पुढें आपल्याच्यानें म्हणवत नाहीं असें म्हणून मध्येंच पोवाडा थांबवून स्वस्थ बसला.

गोंधळ संपला कीं, पुढें कांहीं आहे हें कोणालाच कांहीं समजेना. 'परंतु आतां पहांट झाली, आतां पुरे.' असें म्हणून गोंधळ्याच्या दुसऱ्या साथीदारानें रीतीप्रमाणें गोंधळ संपविला व पुढें रीतीप्रमाणें विधि होऊन लोक उठून जाऊं लागले.

प्रत्येकाच्या अंतःकरणावर त्या पोवाड्याच्या शेवटच्या कडव्यानें फार विलक्षण परिणाम झाला. जो तो आपण मोंगलाची नोकरी करतों हें फार वाईट, आपल्या जिनगानीवर तो तोताराम गोंधळी थुंकला, हें अगदीं वाजवीं होय; आपणसुद्धां आपल्या जिनगानीवर थुंकलें पाहिजे, असेंच आपल्या ठिकाणीं म्हणत व आत्मनिंदा करीत आणि आपण पुढें काय करावें, याबद्दल विचार करीत आपापल्या स्थानाला गेला.

रायाजी घेरेसरनाईकाच्या मनावर तर या पोवाड्याचा फार विलक्षण परिणाम झाला. इतकेंच नव्हे, तर हा पोवाडा म्हणणारा जातीचा गोंधळी नसून स्वतः शिवाजी महाराज किंवा त्यांच्या पदरचा कोणी शूर मर्द असावा असेंहि त्याला वाटलें.

या गोष्टीची शहानिशा करून काय खरें आहे तें शोधून काढावें अशीहि त्यास इच्छा झाली व गर्दी थोडीशी कमी होतांच त्यानें तोतारामास खूण करून एकीकडे नेलें आणि धीट-

पणानें एकदम म्हणतो, ' तोताराम, तूं जातीचा गोंधळी दिसत नाहींस. गोंधळ्याच्या वेषानं आलेला दुसरा कोणी आहेस. माझ्या जवळून चोरून ठेवूं नकोस. काय असेल तें खरं सांग. '

तोताराम म्हणाला, ' रायाजी नाईक, तुमच्यापासून चोरून ठेवायचा जर माझा हेतु असता तर एवढा खटाटोप केला असता तरी कशाला ? मी अगदीं कांहींसुद्धां आपल्यापासून चोरून ठेवीत नाहीं. घ्या, मी स्पष्ट सांगतों कीं, तुळशीदास गोंधळ्याचा भाऊ म्हणून आलेला हा तोताराम खरा तोताराम नाहीं. मी शिवाजी महाराजांचा नोकर आहें—मला हा माझा पेशा सांगायला किती अभिमान वाटतो म्हणतां ?

' माझं नांव तानाजी, आणखी मी आपली भेट घ्यायला आलों आहें. सरळपणानं येऊन भेट घेण्यापेक्षां आपल्याला आणखीं आपल्या या सगळ्या लोकांना थोडंबहुत जागं करून मग भेटावं असा विचार करून ही गोंधळ्याच्या सोंगाची बतावणी केली. आतां तुम्हांला जागं केलं आहे. मीं आपलं कर्तव्य केलं आहे. तुम्ही आतां वाटेल तें करा. '

' तानाजी ' हें नांव ऐकतांच रायाजीचे डोळे एकदम विस्तृत झाले. जणूं काय आपण पाहतों आहोंत हें जागेपणींच कीं स्वप्नांत, याचाच त्याच्या मनांत विचार चालला होता. सुमारें पांच मिनिटें याप्रमाणें गेल्यानंतर तो तानाजीस हलकेंच म्हणतो, ' तानाजीराव, तुमचं धाडस जबर. समजा कीं, माझ्या जागीं मी नसतों, दुसरा कोणी पुरा त्या मोंगलांचा भक्त असता तर त्यानं आपल्याला ताबडतोब किल्ल्यावर नेलं असतं आणि त्या उदयभानूच्या पुढं उभं करून वेड्यावांकड्या तऱ्हेनं आपला जीव घेतला असता. '

'रायाजी नाईक,' तानाजी शांतपणें व स्मित करून म्हणतो, 'धन्यानं सांगितलेली कामगिरी करितांना आपल्या जिवाला काय होईल याचा विचार करावयाचा असतो काय ?'

'अलबत ! केव्हां केव्हां करावाच लागतो.' रायाजीनें त्यास उत्तर दिलें आणि तो काय म्हणतो हें पाहण्यासाठीं अगदीं स्तब्धपणें तो त्याच्या चर्येकडे पाहूं लागला.

तानाजी त्यावर पुन्हां त्यास म्हणतो, 'केव्हां केव्हां करावा लागतो, नेहमीं नव्हे. पण सध्यांची वेळ तो विचार करण्याची नव्हती आणि आपण सर्वस्वीं मोंगलांना वाहिलेले नाहीं अशी माझी खात्री होती.'

'कशावरून ?' रायाजीनें त्यास पुन्हां प्रश्न विचारला.

'मनुष्याचा स्वभाव जाणण्याची कला माझ्या अंगीं अगदीं लहानपणापासून उपजतांच आहे असं म्हटलं तरी चालेल.' तानाजीनें पुन्हां त्यास हंसत हंसतच उत्तर दिलें.

नंतर तो किंचित स्तब्ध बसला आणि पुढें रायाजीस म्हणतो, 'बरं, हें आपण विचारलं तें ठीक झालं. मीं त्याला उत्तरहि दिलं. आतां पुढं काय करायचं तें बोला. मी आलों तो कांहींतरी धीटपणा करून काम फत्ते करून तरी जायचं, नाहींतर प्राण द्यायचा अशा बेतानं आलों आहें. नाना प्रकारच्या युक्त्या करून आपल्यापर्यंत पोहोंचलों आहें.

'आपल्याला सध्यांची मोंगलांची ताबेदारी आवडत असली तर माझं बोलणं नाहीं. मला वर नेऊन गुजरा, माझा कडेलोट होऊं द्या. आवडत नसली तर गड काबीज करण्याला मदत करा आपली मदत आम्हांला इतकीच पाहिजे कीं, वर

चढायला सोयीशी जागा शोधायला सवड सांपडावी, आणखी दोनचारशें माणूस इकडे व दोनचारशें माणूस तिकडे दुसऱ्या अंगाला गुपचूप येऊन उभं राहिलं तर बातमी वर जाऊं नये.

'बस्स, इतकं झालं कीं, पुढं छापा घालायचं काम आमचं, आम्ही तें करतों. रायाजी नाईक, आतां मनाचा निश्चय करा. महाराजांना मदत करून आपला हिंदु धर्म राखण्याला मदत केल्याचं समाधान घ्या, नाहींतर मला गिरफ्दार करून वर घेऊन जा कसे. मी अधिक पाल्हाळानं बोलतच नाहीं.'

तानाजीचें तें बोलणें ऐकून रायाजी अगदीं स्तब्ध झाला. नंतर म्हणतो, 'ठीक आहे. मी तुम्हांला मदत करतों. तहामध्यें महाराजांनीं हा किल्ला मोंगलांना परत दिला तेव्हांच आम्हांला अतिशय वाईट वाटलं. पण महाराजांचा तरी इलाज नसेल. त्यांनीं काय करावं ?

'ठीक, ठीक तानाजी, तुमचा धीटपणा जबर. इतक्या मंडळींत तुम्ही पोवाडा म्हणावा, आणखी अस्तन्या वर चढवून, उठून उभं राहून मोठ्या त्वेषानं आमच्या सगळ्यांच्या 'जिनगानीवर थू:' करावं यापेक्षां आणखी शौर्याची गोष्ट ती काय पाहिजे ?

'चला, ह्या घेऱ्यांतले सगळे कोळी आणि वरचे महार तुम्हांला अनुकूल झाले म्हणून समजा. आज इथून गेलेला प्रत्येक इसम याच विचारांत असेल. त्याला जाऊन बोलण्याचा अवकाश, तो कबूल होणारच.

'पंधरा दिवस झाले असतील नसतील, माझी आणखी

महाराजांचा नाईक गोंदनाक याची गांठ पडली होती. तेव्हां आम्ही हेंच म्हणत होतों कीं, कोंडाणा महाराजांनीं परत द्यायचा नव्हता. त्याला मी तुमच्यासाठीं बोलावून आणतों आणि मग पुढं काय काय, कसं कसं करायचं तें ठरवूं. दौलतराव नाईकांची मदत म्हणूनच तुम्ही इथं आलां. त्यांनाहि आपण या मसलतींत घेऊं.'

तें ऐकून तानाजी हंसला आणि म्हणतो, 'ते या मसलतींत आहेतच. मी कोण हें त्यांना ठाऊक असून त्यांनींच मला असं इकडं आणलं. त्यांची व आमची बालपणापासूनची पुण्याची मैत्री !'

० ० ०

## ७

माघ वद्य पंचमीच्या मध्यरात्रीं कोंडाण्यावरील फौजेंतला एक रजपूत शिपाई झुंजार बुरुजावर पहाऱ्यास होता. त्याचे इतर सोबती स्वस्थ निजले होते. ते रजपूत शिपाई व मुसलमान असेच निजत. आपल्यांपैकीं एकदोघांना आळीपाळीनें जागत ठेवून बाकीच्यांनीं स्वस्थ घोरत पडावयाचें हा त्यांचा क्रमच असे.

एक-दोघे तरी जागे ठेवावयाचे, त्याचा हेतु एवढाच कीं, उदयभानु मध्येंच एखाद्या वेळीं पहारा वगैरे जेथल्या तेथें आहेत कीं नाहींत तें पहाण्यासाठीं येत असे. त्याची दूर चाहूल लागल्याबरोबर या जागे असलेल्या लोकांनीं बाकीच्यांस उठवावें.

त्या रजपूत शिपायांच्या मतें हा किल्ला इतका मजबूत व कोणीकडूनहि चढून येण्यास अशक्य असा होता कीं त्याकरितां पहारा ठेवणें हें अगदीं केवळ अनावश्यक होतें. तेव्हां उदयभानूची चिरचिर चालेल म्हणूनच कोणीतरी जागत बसून बाकीच्यांनीं खुशाल झोंपा काढाव्या, अशी त्या शिपाई लोकांनीं व्यवस्था केली होती.

उदयभानूनें खालीं कोळ्या महाराजांच्या पहाऱ्याची खूप सक्ति केली खरी, परंतु वरच्या लोकांवर त्याचें वजन मुळींच नव्हतें असें म्हटलें तरी चालेल. ते लोक त्याच्या आधीं-पासूनच तेथें होते, त्यांस आपल्यावर आणखी शिपाई आणले म्हणून, वैषम्य वाटून त्यांचा व त्या नव्या शिपायांचा तिरस्कार वाटूं लागला होता, आणि जे त्याच्याबरोबर नवीन आलेले होते त्यांना त्याच्याबद्दल कधींच सन्मान नव्हता.

त्यांतून त्यानें मोठ्या कुलीन घराण्यांतील सती आपला धर्म आचरीत असतां तिला अडवून आणलें म्हणून तर सर्वांस त्याचा फारच तिरस्कार वाटे. त्यामुळें त्याच्या सक्तीचा कांहीं उपयोग न होतां उलट त्या शिपायांचीच त्याला थोडीबहुत भीति वाटे ! तथापि तो ती कधीं बाहेर दिसूं देत नसे. वेळ पडली तर आपण वाटेल त्याला वाटेल ती शिक्षा करण्यास

कमी करणार नाहीं, असेंच तो सर्वांस दाखवी. त्यामुळें शिपायींहि बाह्यतः आपण आपल्या कामांत दक्ष आहोंत असें दाखवीत असत.

झुंजार बुरुजावर जी शिपायांची टोळी ठेवली होती, त्यांत वर सांगितलेला शिपाई मात्र रोज पहारा करीत असे. आपल्याला झोंपच येत नाहीं, सबब आपण हें रात्रीच्या पहाऱ्याचें काम घेतों असें म्हणून त्यानें तें काम घेतलें होतें.

हा शिपाई दिवसां कधीं डोकें वरसुद्धां करायचा नाहीं. स्वस्थ कोठेंतरी पडलेला असावयाचा. एखाद्या चतुर माणसास असेंसुद्धां वाटायचें कीं, हा कांहीं कारणाकरितां दुपारीं तोंड लपवीत असतो.

त्याच्या बरोबरीचे इतर शिपाई त्यास हा आपला एक विक्षिप्त प्राणी आहे असें समजून त्याची चेष्टा करीत. परंतु त्यानें त्यांस कधींहि उलट उत्तर दिलें नाहीं किंवा रागानें त्यांच्या विनोदाचा वगैरे प्रतिकार केला नाहीं.

कोणी कांहीं काम सांगो, जगत्सिंग हटकून त्याचें तें काम करून टाकावयाचा, कधीं नाहीं म्हणून म्हणायचा नाहीं. यामुळ कोणीहि त्यास ' हा नको ' असें म्हणत नसे. ज्याला त्याला तो आपल्याजवळ हवा. परंतु जगत्सिंगाचा परम स्नेही विशाळदेव म्हणून एक होता. त्याच्याजवळ मात्र तो मनांतील गोष्ट सांगत असे.

विशाळदेवहि यावेळीं निजला होता. एकटा जगत्सिंग जागा होता आणि झुंजार बुरुजापासून तो कलावंतिणीच्या बुरुजापर्यंत लांबवर येरझारा घालीत होता. तेथून तितक्यांत

सुमारें पांच चौक्या होत्या; परंतु त्याच्या एकटयाच्या जिवावर त्या पांचहि चौक्यांचे लोक अगदीं चैनींत होते. आणि 'तुम्ही बिलकुल काळजी करूं नका. तसाच प्रसंग आला व जर उदयभानु इकडे येतोसा दिसला तर मी तुम्हांला खचित उठवीन.' असें त्यांस तो बजावीत असे.

आजपर्यंत पांच–सात वेळां त्यानें याप्रमाणें निरनिराळ्या ठिकाणच्या लोकांची अब्रु राखिली होती. तेव्हां मग काय, त्याच्या जिवावर हे अगदीं बिनघोर असत.

वर सांगिल्याप्रमाणें तो हिंडत असतां ठिकठिकाणीं दबके, कानोसा घेतल्याप्रमाणें करी आणि पुन्हां आपल्या वहिवाटीप्रमाणें हिंडे. करतांकरतां एकवार तो एका ठिकाणीं थांबला आणि त्यानें तटाच्या अगदीं जवळ जाऊन एकवार खालचे बाजूस डोकावून पाहिलें. त्यास कांहीं दिसलें नाहीं.

नंतर त्यानें एकवार हलकेंच चुटक्या वाजविल्या, त्याला खालून तसेंच प्रत्युत्तर आलें. त्याबरोबर त्याचा चेहरा खूप खूप प्रफुल्ल झाला आणि तो पुन्हां खालीं डोकावून पाहूं लागला.

नंतर त्यानें आपल्याजवळची एक मेख काढून ती तेथें किल्ल्याच्या आंतल्या बाजूस जमिनींत चांगली ठोकून बसविली. नंतर पुन्हां त्यानें एक चुटकी वाजविली. त्याबरोबर खालून एक भला जाड दोरखंड वर फेंकला गेला. त्याचें जें टोंक हातीं लागलें, तें त्यानें धरलें आणि तें तो मेखेला बांधूं लागला. त्यानें तें भक्कम बांधलेंहि आणि मग तटावरून दोर अर्थातच टांगता राहिला.

त्या दोराला धरून तो चटकन् खालीं उतरून जाण्याच्या बेतांत होता, इतक्यांत त्याला कांहीं चाहूल लागली म्हणून तो इकडे तिकडे जो पहातो, तों कांहींच दिसेना. पुन्हां त्यानें इकडे तिकडे पाहिलें आणि पुन्हां एकदां दोर हातीं धरून खालीं उतरून जाण्याचा आपळा यत्न त्यानें आरंभिला.

त्यानें दोर धरून तट तर ओलांडला आणि आतां सर-सर खालीं जाणार, तों त्याला असें वाटलें कीं, आपल्याखालीं दरींत कोठेंतरी कोणी बोलतें आहे. कोण असावें, काय असावें याचा विचार मनांत येतो न येतो, तों त्याच्या पायाला एक तीर बसून त्याच्या दुःखानें त्याला झटका दिला.

त्यासरशीं वरून मेखहि उपटली गेली आणि दोरासकट खालीं पडतांना त्याच्या तोंडून, 'हाय हाय, आतां मी त्यांना कसचा सोडविणार ?' एवढे शब्द अचानक बाहेर पडले. दैव-वादी असतात ते नेहमीं असें म्हणत असतात कीं, तारत्यापुढें मारत्याचें चालत नाहीं. तीच अवस्था या रजपूत शिपायाची झाली.

तो ज्या स्थानापासून निसटून पडला, त्या स्थानापासून सरळ न पडतां जर वांकडा पडला असता तर त्याचा कपाळ-मोक्ष होऊन प्राणच जावयाचा. परंतु सध्याच्या प्रसंगीं तसें झालें नाहीं. तो जो पडला तो एका गर्द छायेंत वृक्षावर पडून त्या वृक्षाखालीं असणाऱ्या दोन माणसांपुढें असा लोंवत राहिला.

या माणसांपैकींच एकानें तीर मारला होता. त्यामुळें त्यांस हें काय पडलें म्हणून भय वाटलें नाहीं.

ते दोघे झाडाखालीं लपलेले गृहस्थ तानाजी व रायाजी

होत. रायाजीनें आपली मदत देण्याचें अभिवचन दिल्यावर शेलारमामा, रायाजी नाईक, दौलतराव व तानाजी यांची एक बैठक होऊन शपथक्रिया झाली आणि शेलारमामा तानाजीस रायाजीच्याबरोबर पुढें काय काय करावयाचें तें ठरविण्यास ठेवून आपण आपले मावळे लोक घेऊन येण्यास गेला.

आतां होईल तितकी त्वरा करण्याचें त्यांचें ठरलें. त्यामुळें एवढी तांतडी. शेलारमामा गेल्यानंतर दुसरेच दिवशीं आपण घेरेसरनाईक या नात्यानें एकदां घेरा हिंडून कशी काय व्यवस्था आहे तें पाहूं असा वहाणा करून हिंडावयास निघून रायाजीनें तानाजीला एकवार आपल्या सगळ्या वाराहि मेटचांवरून हिंडवून आणून किल्ल्याच्या सर्व बाजू दाखविल्या आणि कोणीकडून कसें चढणें शक्य आहे, हेंहि त्यांनीं ठिक-ठिकाणीं उभे राहून पाहिलें.

नंतर अमुक ठिकाणीं घोरपड लावून चढून जाणें शक्य आहे, असें त्यांनीं एकांतीं बसून ठरविल्यावरून आपण एकवार प्रयत्न करून पहावयाचें त्यांनीं ठरविलें.

ज्या रात्रीं त्यांनीं प्रयत्न करण्याचें ठरविलें, त्याच रात्रीं तो करण्याकरितां ते विवक्षित ठिकाणीं गेले असतां आपल्या नेमक्या ठिकाणीं कांहींतरी गडबड आहे, आपली बातमी बाहेर फुटली असून आपल्यास पकडण्यासाठीं तटावरून कोणी-तरी मुद्दाम अलगत उतरतो आहे किंवा कोणी फितूर महार आपली बातमी फोडण्यासाठीं वर जात आहे, असें या दोघांसहि वाटलें.

अशा प्रसंगीं आपण नुसते पळून जाण्यापेक्षां त्या आप-

त्यास पकडावयास येणारास शिक्षा करावी, असें रायाजीच्या म्हणण्यांत आलें. तानाजीनें 'तसं करणं चांगलं नाहीं. एखादा माणूस तसा जायबंदी झाला तर विनाकारण उदयभानूस शंका येऊन तो इथं विशेष बंदोबस्त ठेवील आणि आपली संधि मात्र वायां जाईल, तेव्हां आपण इथून जाऊं. त्यांना खालीं उतरून कांहीं नाहीं असं पाहून जाऊं द्या. म्हणजे उद्यां पुन्हां यत्न करण्याच्यावेळीं कोणी यायचंसुद्धां नाहीं, आपलं काम फत्ते होईल.' असें म्हटलें.

परंतु रायाजीला तें पसंत पडलें नाहीं. तो म्हणे, 'तुम्हीं घावरूं नका. वरचा शिपाई कांहीं नसावा. माझ्या मतें हा खालचा कोणीतरी महार चुगली करायलाच जातो आहे. त्याला पाडलं तर दाद ना फिर्याद. समजा कीं, आपल्या महारांपैकीं हा कोणी असला, आणखीं आपलीं नावंगावं साय-संगीत वर जाऊन कळविलीं तर भलताच प्रकार व्हायचा.' असें बोलत बोलत त्यानें वर न्याहाळून पहात एक तीर सोडलाच.

तोच तीर जगसिंगाला लागून तो वर सांगितल्याप्रमाणें खालीं पडला व त्यांच्यासमोर झाडावर लोंबत राहिला.

त्याला जीवदान दिल्यास त्याच्यापासून आपल्याला किल्ल्यावरच्या बंदोबस्ताची आणखीं माहिती मिळेल, या विचारानें त्यांनीं त्यास उतरून घेऊन मेटयावर आपल्या झोंपडींत न्यायचें ठरवलें.

० ० ०

# ८

तानाजी आणि रायाजीनें त्याला बेशुद्ध अवस्थेंत झोंपडींत उचलून नेलें. त्याच्यावर उपचार केल्यानें कांहीं वेळानें तो शुद्धीवर आला. आपण कोण हें त्यांनीं जगत्‌सिगास सांगितलें.

त्यांचें म्हणणें लक्षांत आल्यावर जगत्‌सिंगाच्या मनांतील संशय दूर झाला. तो त्यांना म्हणाला, 'तुम्हीं किल्ला घेण्याच्या हेतूनं तिथं आलां होतां ?'

जगत्‌सिंग आनंदल्या आवाजानें पुढें म्हणाला, 'वा ! मग माझी तुम्हांला मदतच झाली असती. किल्ल्यावरून चोरून उतरायला किंवा चढून वर जाण्यास तेवढी एकच ओघळ आहे. तुमचा हेतु जर मला आधीं कळता तर किती चांगलं झालं असतं ? माझा केवढा फायदा झाला असता ! पण आज मला अशा वेळीं पाडलंत यानं मात्र मोठा घात झाला.

'एका रजपूत सतीच्या पातिव्रत्याचा नाश होणार आहे. त्यांतून तिला वांचविण्यासाठीं मी प्रयत्न करतों आहें. आणखी तिला सोडवून तेथून उतरून येण्याला कांहीं अडचणी आहेत कीं काय तें पाहण्यासाठीं मी दोर सोडून खालीं उतरून जात

होतों. माझ्या सुदैवानं मला त्यावरच्या पहाऱ्यावरला मल्हारबा महार अनुकूल होऊन त्यानं मदत करण्याचं कबूल केलं.' असें म्हणून त्यानें आपण त्याच्या साह्यानें दोर कसा मिळवला आणि कशा रीतीनें त्याच्या मदतीनें खालीं उतरण्याचा प्रयत्न केला तें सांगितलें.

आपल्याला तीर लागला याचें त्याला वाईट वाटलें नाहीं, पण अशा जखमी अवस्थेंत आपण दुष्ट उदयभानूच्या हातून कमलकुमारीला सोडवण्याची प्रतिज्ञा पार पाडूं शकणार नाहीं या गोष्टीबद्दल त्याला वाईट वाटलें.

तो म्हणाला, 'आतां तो कामांध नवमीच्या दिवशीं रात्रीं आपल्या हेतूप्रमाणं वळजवरीनं तिच्याशीं निका लावणार; त्यानं औरंगाबादेहून मुद्दाम काजीसुद्धां बोलावून आणून ठेवला आहे. आजकाल काय चमत्कार आहे आम्हां हिंदूंच्या दैवाचा ! जें काय करावं तें फसायचं, फत्ते म्हणून व्हायची नाहीं. भगवान एकलिंगजी महाराज, आपल्या मनांत आहे तरी काय ?'

जगत्सिंगाच्या या बोलण्यानें तानाजी व रायाजी यांस विशेष वाईट वाटलें आणि हा उदयभानूला शिव्या देणारा शिपाई कोण ? पतिव्रतेची सोडवणूक करण्याकरिता यानं काय खटाटोप चालविला आहे, त्यांच्या कांहीं लक्षांत येईना; म्हणून त्यांनीं त्यास तें सांगण्याची विनंति केली; तेव्हां त्यानें त्यांना कमलकुमारीची सर्व हकीकत सांगितली.

हें सांगून झाल्यावर तो थोडा वेळ थांबला. नंतर तो म्हणाला, 'केव्हांच त्या दुष्टाच्या कामाग्नीला कमलकुमारीची

आहुति पडायची किंवा आत्महत्या करून तिनं प्राण तरी दिला असता. पण औरंगजेबाच्या लहरीमुळें तिला माघ वद्य नवमीपर्यंत अवधि तरी सांपडला.

'माझी पत्नी तिची फार मैत्रीण. कमलकुमारी सती जाण्यास निघाली तेव्हां ती तिच्यावरोबर त्या अरण्यांत गेली होती. त्या दुष्टानं त्या सतीला पकडून नेलं त्यावेळीं तिला तो पाठवीत असतांहि तिच्याबरोबर तिला वेळप्रसंगीं मदत करायला म्हणून राहिली.

'मला ही बातमी लागतांच त्यांच्या पाठोपाठ दिल्लीस गेलों. दिल्लीस जाऊन उदयभानूच्या घराचा पत्ता लावून आपल्या पत्नीशीं किंवा कमलकुमारीशीं कांहीं संकेत व्यवहार होऊन त्यांस आपण आल्याचं कसं कळवावं याचा विचार करीत उदयभानूच्या दाराशीं उगीच वेड्यासारखा हिंडत होतों.

'तों अकस्मात काय चमत्कार झाला कीं, उदयभानु कमलकुमारीला व तिच्या वापाला पालखींत घालून बादशहाकडे घेऊन जाण्यास निघालेला दिसला आणि माझी पत्नी आपल्या मैत्रिणीला धीर देण्यासाठीं म्हणून दारांत आली होती, तिचं माझ्याकडे लक्ष गेलं. लागलीच तिनं मला थांवण्याबद्दल खूण केली व आपण वर जाऊन पड्याआडून, झरोक्यांतून एक चिठ्ठी टाकली.

'त्यांत तिनं दुसरे दिवशीं सकाळीं मला पुन: त्याच जागी बोलावलं. तिनं लिहिल्याप्रमाणं भिकाऱ्याच्या वेषांत मी तिथं गेलों तेव्हां तिनं माझ्या पदरांत सबंध भाकरी टाकली. त्या भाकरीच्या पोटांत एक कागद असून त्यांत सगळी माहिती लिहिली होती.

'त्यांत " बादशहानं तीन महिनेपर्यंत अवधि ठेवला आहे. तेव्हां त्याच्या आंत जर आमच्या कुळाचं नांव राखण्यासाठीं कांहीं प्रयत्न झाला तर पहा, नाहींपेक्षां आपल्या कुळाचं नांव राखण्यासाठीं आम्हांला दोघींनाहि कांहीं करणं भाग पडेल." असं लिहिलं.'

ही हकीकत त्या चिठ्ठीवरून कळतांच जगत्सिगानें या मुदतींत उदयभानूच्या तावडींतून कमलकुमारीला सोडविण्याची प्रतिज्ञा केली. त्या प्रतिज्ञापूर्तीसाठीं त्यानें मोठ्या खुबीनें उदयभानूच्या सैन्यांत प्रवेश करून घेतला.

विशाळदेव नांवाच्या रजपूत शिपायाला एकदां बुडत असतांना त्यानें वांचवलें. त्यामुळें तो त्याचा मित्र झाला. त्यानें आपली खरी माहिती सांगितली. आपण उदयभानूच्या सैन्यांत कां शिरकाव करून घेतला हा हेतूहि त्यानें त्याला कथन केला.

विशाळदेवानें त्यांना मदत करण्याचें कबूल केलें. नाना प्रकारच्या युक्त्या लढवून त्या दोघींनाहि त्यानें धीर दिला. त्यामुळेंच त्यांनीं आपल्या जिवाचें बरेंवाईट करून घेतलें नाहीं.

त्याची ही हकीकत ऐकून तानाजीला अत्यंत क्रोध आला. त्याला 'थू: तुमच्या जिनगानीवर' हा पोवाडा आठवला. रायाजीचीहि तीच अवस्था झाली. सती जाणाऱ्या कमलकुमारीला सोडवलें पाहिजे हें त्या दोघांच्याहि मनांत एकाच वेळीं आलें.

तानाजी जगत्सिगाला म्हणाला, 'आम्हीं खरोखरच तुझा घात केला, पण कांहीं हरकत नाहीं. माझ्या लोकांची पहिली तुकडी इथं परवां म्हणजे अष्टमीला रात्रीं किंवा रात्र उलटल्या-

वर पहांटे नेमल्या जागीं येईल. दुसरी दुसऱ्या दिवशीं पहांटे यायची आहे. ती आली, तर फारच उत्तम होईल.

'मदत नाहीं आली तरी हरकत नाहीं. पहिल्या तुकडींत जितके लोक येतील—पांच येवोत, पंचवीस येवोत, पन्नास येवोत, तितकेच लोक बरोबर घेऊन मी किल्ल्यावर छापा घालीन. आणि नवमीची मध्यरात्र उलटण्याच्या आधीं त्यानं त्या सतीशीं लग्न करण्याच्या आधीं माझ्या या महाराजांनीं दिलेल्या तलवारीशीं त्याचा निका लावून देईन ! आतां जास्त बोलत नाहीं. सतीच्या पुण्याईनं मला माझ्या पन्नास लोकांनिशींच जय मिळेल !'

० ० ०

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग

जों जों माघ वद्य नवमीचा दिवस जवळ येत चालला, तों तों उदयभानूचें चित्त अत्यंत व्यग्र होत चाललें. तशांत आतां त्याला विशेष असा उद्योग कांहींच नव्हता. जसवंतसिंग व मोआझिम शहजादा यांचे संबंधानें जें काय लिहावयाचें तें त्यानें लिहून बादशहाकडे रवानाहि केलें होतें. आपल्या मनानें किल्ल्याची वरची जी काय व्यवस्था व बंदोबस्ती करावयाची ती सर्व केली.

आतां बादशहाचें पत्रच काय तें येऊन आपली बदली जसवंतसिंगाच्या जागीं व्हावयाची; ती झाली म्हणजे मग आपण दक्षिणचे सुभेदार झालों. मग आपणांस कांहींसुद्धां कमी नाहीं. वर्ष–सहा महिन्यांत त्या शिवाजीला पकडून बादशहाच्या स्वाधीन करून इकडली बंदोबस्ती बरोबर झाली असें बादशहाच्या निदर्शनास आणून दिलें म्हणजे बादशहा आपल्यावर खचित खूष होईल.

तो असा खूष झाला म्हणजे आपण एकदां उदेपूरवर स्वारी करण्याची परवानगी घेऊं आणि ज्यांनीं आपणांस अगदीं तुच्छ करून, पदोपदीं आपला अपमान केला त्यांची चांगली खोडकी जिरवूं. अशा तऱ्हेचें मनोराज्य तो करूं लागला होता.

तशांत माघ वद्य नवमीचा दिवस अगदीं नजीक येऊन ठेपला. त्या दिवशीं मध्यरात्रीच्या ठोक्याला आपण कमलकुमारीशीं लग्न लावून तिच्या बापाला एक, महाराजा राजसिंहास एक व इतर जे जे रजपूत लोक आपली चेष्टा करीत होते तेवढ्या सर्वांना एक एक पत्र लिहून आपला बडेजाव किती वाढला आहे हें दाखवूं असें त्यानें मनांत योजिलें होतें.

देवलदेवी जर कमलकुमारीला नेहमीं उत्तेजन देण्याला नसती तर तिनें खचित आत्मनाशहि करून घेतला असता. देवलदेवी तिला 'आपल्याला दोरावरून कदाचित् किल्ला उतरून पळावं लागेल. तेव्हां तूं अशी झुरत जाऊं नकोस, अंगांत ताकद पाहिजे. असं झुरून अशक्त झाल्यावर मग आपल्या कार्यांत आपणांस सिद्धी कशी येणार ?' असें घटकोघटकीं सांगत असे.

रोज 'आपल्या नवऱ्यानं—जगत्सिगानं असं सांगितलं, आज अमुक अमुक महार त्यांना मदत करण्यास कबूल झाला आहे, उद्यां अमुक कोळ्यानं मदत करण्याचं कबूल केलं' असें सांगून कोणीकडून तिला हुशार ठेवण्याचा तिनें प्रयत्न चालविला होता व त्यांत तिला बरेंच यशहि आलें होतें.

'माघ वद्य पंचमीच्या दिवशीं मध्यरात्रीस मी स्वतः एकवार तटावरून दोर टाकून पहातों आणि बरोबर जुळलं म्हणजे नेहमींप्रमाणं महालाच्या बारद्वारींत जाऊन पडेल अशा बेतानं ,रात्रीं चिठ्ठीची गोळी फेंकून देऊन पुढची तजवीज कळवितों.' अशा अर्थाचा मजकूर जगत्सिगानें देवलदेवीला कळविला होता.

दोघींच्याहि मनाचा दृढनिश्चय असल्यामुळें त्यांना आपण आतां सुटलोंच असें वाटूं लागलें. कमलकुमारीला तर हर्षच होण्याची पाळी आली.

पंचमीच्या दुसऱ्या दिवशीं काय काय, कसें कसें करायचें याबद्दल चिठ्ठी आली असेल अशा आशेनें देवलदेवी नियमित ठिकाणीं जाऊन पहाते तों चिठ्ठीचपाटी कांहीं नाहीं; त्याबरोबर तिच्या काळजांत एकदम चर्रर् झालें.

जी व्यवस्था व्हावयाची ती झाली नसली तरीसुद्धां 'आज झाली नाहीं, उद्यां होईल.' एवढेंच लिहून गोळी टाकलेली असावयाची, ती ज्याअर्थीं नाहीं त्याअर्थीं सुचिन्ह नव्हे, असें मनांत येऊन तिला काळजी लागली. तिनें ती आपली नियमित बारद्वारी बारीक दृष्टीनें पाहिली.

कांहींसुद्धां सांपडलें नाहीं. 'कांहीं घात तर झाला नसेल

ना? किंवा दोर सोडून खालीं उतरण्याच्यावेळीं हात वगैरे सुटून तर कांहीं झालं नाहीं? कदाचित् बेत बाहेर फुटून त्या दुष्ट उदयभानूला सारं कळून त्यानं तुरुंगांत तर टाकलं नसेल?' असे एक ना दोन, पंचवीस हजार खेदकारक व भीतिजनक विचार तिच्या मनांत उभे राहिले आणि अर्थातच तिला कांहीं सुचेनासें झालें.

आज तीन महिनेपर्यंत नानाप्रकारचीं संकटें भोगून त्यांनीं जो व्यूह रचला तो केवळ एक–दोन दिवसांच्या आपल्या उतावळीमुळें निष्फळ करणें म्हणजे केवढा मूर्खपणा होणार आहे? त्यापेक्षां आपला प्राणघात करून घेण्याला लागणारीं साधनें जय्यत ठेवून नवमीच्या संध्याकाळपर्यंत वाट पहावी. तोंपर्यंत जर कांहीं कळलें नाहीं, तर खुशाल देह ठेवावा.

हा विचार मनांत येतांच तेंहि तिच्या मनास बरोबर वाटलें आणि त्याप्रमाणेंच करावें असें तिनें मनांत ठरविलें.

माघ वद्य नवमीचा दिवस उगवला. पंचमीच्या दिवशीं रात्रीं आपल्या किल्ल्यावरील एक शिपाई नाहींसा झाला, त्याचा पत्ता नाहीं असें षष्ठीच्याच दिवशीं तिसरे प्रहरीं उदयभानूला कळविण्यांत आलें.

'कोणी कड्याविड्यावरून उतरतांना पाय घसरून किंवा पिऊन तटावरून झुकांडे खात चालतांना झोक जाऊन पडला असेल, नीट शोध करा. इकडून एखादा माणूस गेला तर त्याची मोठीशी पर्वा नाहीं. सावध कां नव्हता गुलाम! पहा कुठं असेल. बाहेरून कोणी अधिक आला तर मात्र माझ्या-पुढं आणा.' असें तुच्छपणें उत्तर देऊन त्यानें तिकडे अगदीं

दुर्लक्ष केलें.

माघ वद्य नवमीचा दिवस उगवला त्यावेळीं तर त्याच्या आनंदाला पारावार नाहींसा झाला. आतां पांच-सहा प्रहरांचा अवकाश, कीं इतके दिवस जें आपल्यापासून दूर दूर राहूं पाहते आहे तें आपलें होणार ! या विचारानें त्याचा चेहरा फार प्रफुल्लित झाला.

या आनंदांत तो मग्न होता. इतक्यांत दिल्लीहून कोणी सांडणीस्वार थैली घेऊन आला आहे अशी चोपदारानें वर्दी दिली. आपण येथें आल्यानंतर पाठविलेल्या पत्राचें उत्तर तर हें खास नव्हे, असें त्यास वाटलें. याचें कारण आपला हेजीब कितीहि जलदीनें गेला तरी तो परत येण्याइतका वेळ अजून झालाच नव्हता.

अर्थातच बादशहानें दुसऱ्याच कांहीं कारणानें हा स्वार पाठविला असेल, काय आहे तें पाहूं, असें मनाशीं म्हणून त्यानें त्या स्वारापासली थैली घेऊन येण्याला सांगितलें. आज माघ वद्य नवमीलाच थैली येऊन पोहोंचावी अशा बेतानें बादशहानें ती मुद्दाम तर नसेल ना पाठविली ? असेंहि पण त्याच्या मनांत येऊन त्याचें काळीज अगदीं चर्र झालें.

थैली आधीं उघडली आणि तींत आपल्याला भय वाटतें तसला जर कांहीं मजकूर असला तर मग आपल्याला त्या हुकुमाची मुळींच अवज्ञा करतां येणार नाहीं. त्यापेक्षां हुकूम तसाच सध्यां दडपून ठेवून, आपलें कार्य झाल्यानंतर मग पहातां येईल, असें मनांत ठरवून त्यानें चोपदारानें आणून दिलेली ती थैली तिरस्कारानें फेंकून दिली.

पुनः त्याचें त्यालाच काय वाटलें कोणास ठाऊक? त्याच चोपदाराला सांगून त्यानें ती उचलवून आणविली व तिच्यावरची झिरझिरीत कापडाची पिशवी काढून आंतल्या थैलीकडे पहात व तिच्या गोंड्याशीं आपल्या हातांनीं खेळत तो विचार करूं लागला.

अखेरीस त्यानें चटकन् ते गोंडे ओढले व आंतला लखोटा काढला. आंत बादशहाचें पत्र होतें. तें सुमारें दोन अडीच बोटें रुंदीच्या घड्या घालून गुंडाळलेलें होतें व वरच बादशहाच्या हस्तमुद्रेचा त्यावर शिक्का होता. तोहि त्यानें त्वरित सोडला आणि आंतला कागद उलगडला.

सुरेख सोनेरी पत्ती काढलेला कागद आणि त्यावर केवळ मोत्यांच्या ओळीप्रमाणें अक्षरें काढलेलीं. औरंगजेब बादशहास स्वतः लिहिण्याची हौस फार. हें त्याचें अथपासून इतिपर्यंत स्वदस्तुरचें पत्र होतें. त्याचें अक्षर फार दिव्य होतें.

पहिल्या चार ओळी वाचल्याबरोबर उदयभानूची चर्या एखाद्या मोठ्या कमलाप्रमाणें प्रफुल्लित झाली. पत्रांत पुढील अर्थाचा मजकूर होता—

"माझ्या हुकुमाप्रमाणें तूं आजपर्यंत वागला असलास, तर आज तुला मी मोठ्या आनंदानें कमलकुमारी अपण करतों. तूं व ती येथून गेल्यानंतर पंधरा-वीस दिवससुद्धां तिचा बाप जगला नाहीं.

तूं काफिर शिवाजीला (सैतान त्याचें निसंतान करो!) पकडून आणून माझे स्वाधीन कर, म्हणजे आज आहे त्याच्याहि-पेक्षां माझें तुझ्यावर अधिक प्रेम बसेल. तुला सुख होऊं दे.

परंतु त्या सुखाच्या उपभोगांत दंग होऊन त्या काफराला किंवा त्याच्या दोस्तदारांना तुझा गळा कापण्याची संधि मात्र देऊं नकोस. त्यानें आजपर्यंत असे कितीक सरदारांचे गळे कापले आहेत ! म्हणून बजावून लिहितों आहें.

नाहींतर तूं अगदीं सुखाच्या दर्यांत पोहत राहशील आणि त्याच रात्रीं तो येऊन तुझा गळा कापील ! अल्ला तुझें त्यापासून पूर्ण रक्षण करो आणि बादशहाची चाकरी इमानें इतबारें करण्याची आजपर्यंतची तुझी बुद्धि सदैव अशीच राहो !"

हें पत्र वाचतांक्षणींच उदयभानूला इतका आनंद झाला कीं आपण कोठें आहोंत, काय करतों आहोंत, याचें स्मरणसुद्धां न राहून त्यानें मोठ्यानें हास्य केलें.

कमलकुमारीची प्राप्ति होण्यास फक्त काय तो चार प्रहरांचाच अवकाश होता ! तो आपल्या त्या भावी सुखाच्या विचारांत अगदीं गर्क होऊन गेला होता. आणि एकवार आपण कमलकुमारीच्या महालांत जाऊन यावें असा त्यानें विचार केला व त्याप्रमाणें तो उठून महालाकडे गेलाहि.

जो काळ उदयभानूला मोठ्या सुखाचा व आनंदाचा वाटत होता, तोच काळ, तोच प्रहर कमलकुमारीला दुःखाच्या परमावधीचा झाला होता. एखाद्याला वधस्तंभावर नेऊन वध करण्याची शिक्षा सांगितली असतां त्याची जशी अवस्था होते त्याप्रमाणेंच तिची अवस्था आतां झाली होती.

तीन दिवसांत जेव्हां कांहीं कळलें नाहीं तेव्हां जगत्सिंह नष्ट झाला याबद्दल देवलदेवीस व तिला मुळींसुद्धां शंका

राहिली नाहीं आणि त्या दोघी एकसारख्या शोक करीत एक-मेकींकडे पहात बसल्या.

त्या अशा स्थितींत बसल्या असतां उदयभानु येत असल्याची वर्दी त्यांना देण्यांत आली. कमलकुमारी तर भयानें निश्चेष्ट झाली. देवलदेवीनें तिची ती अवस्था पाहून स्वतःला सांवरलें. उदयभानु आतां कमलकुमारीला छळणार या विचारानें तिचा राग अनावर झाला.

उदयभानु तिथें आला. त्यावेळीं तिनें त्याची कानउघाडणी केली. तिचे ते भयंकर शब्द ऐकून व विलक्षण आविर्भाव पाहून तो चकित झाला. संध्याकाळपर्यंत त्यानें नमतें घ्यायचें ठरवलें. त्या दोघींची फाटाफूट करण्यासाठीं त्यानें उपाय योजला.

देवलदेवीला तेथून हबशिणी दासींच्या साह्यानें उचलून दुसरीकडे नेऊन तिला त्यानें कोंडून ठेवलें. कमलकुमारीलाहि बालेकिल्ल्यांतील आपल्या महालांत नेऊन ठेवलें. तिनें आत्मघात करूं नये म्हणून दोन हबशिणी तिच्यावर पहाऱ्यासाठीं ठेवल्या.

० ० ०

# १०

त्या दिवशीं उदयभानूचा असा उद्योग चालला असतां खालीं रायाजीच्या घरांत तानाजी अगदीं सचिंतपणें बसला

होता. तो कोणाची तरी वाट पहात होता हें उघड दिसत होतें. तीन-तीनदां तो उन्हाकडे बघे आणि अजून कांहीं बातमी कशी नाहीं असें जवळ बसलेल्या जगतिंसगाला म्हणे.

जगतिंसग अगदीं तसाच चिंतातुर दिसला. आपल्याकडून कांहीं बातमी नाहीं तेव्हां आपली बायको आतां काय विचारांत असेल ? आतां आपली सुटका होत नाहीं असें वाटून दोघीहि आपल्या जिवाला कांहींतरी करून घेतील याबद्दल त्याला कांहींच शंका उरली नाहीं.

तथापि त्यानें निराशेचा एकहि उद्‌गार तोंडावाटे काढला नाहीं. कमलकुमारीस सोडविण्याची उत्कंठा आपल्यापेक्षां तानाजीलाच विशेष आहे, असें त्याच्या आतां अनुभवास आलें होतें.

'माझे लोक आले नाहींत, तर ऐनवेळीं तूं आणखीं मी, रायाजी असे तिघेच वर चढून जाऊन त्या साध्वीला सोडवूं. तिला सोडविल्यावर तो दुष्ट तिच्या पाठीमागं लागला, तर तिथल्या रजपुतांना चिथावून देऊन लंबे करूं. निदान तिची विटंबना तरी होऊं देणार नाहीं. वेळच आली तर दोघींनाहि रजपूत–क्षत्रियांच्या स्त्रियांना योग्य असा मृत्यु तूं दे.' असें तानाजीनें त्यास सांगितलें होते.

आपण एकटच्यानें वर जाण्याचें धाडस केल्यानें शूराम योग्य अशा मृत्यूखेरीज दुसरें कांहींहि लाभणें शक्य नाहीं, हें तानाजी जाणूनच होता. आदले दिवशीं सकाळीं एक तुकडी यावयाची, निदान आज सकाळीं तरी यावयाची असें असतां कांहीं पत्ता नाहीं म्हणून त्यानें रायाजीला शोधाला पाठविलें.

त्याचासुद्धां अजून कांहीं पत्ता नाहीं. तो असा विचारमग्न असतांनाच शेलारमामा आला.

येसा कणेकर पन्नासजणांची तुकडी घेऊन मदतीला आला असल्याची बातमी शेलारमामानें त्यांना येऊन सांगतांच त्यांना मोठा आनंद झाला. रायाजीहि शेलारमामावरोवर आला होता. सूर्याजी आणखीं कांहीं लोक घेऊन मदतीला येत असल्याची वार्ताहि त्यानें तानाजीला कथन केली. सूर्याजी रात्रीं दहापर्यंत येईल.

तानाजीनें शेलारमामाला तो गेल्यापासून आपण काय काय केलें तें सांगितलें. जगतिसगाची हकीकतहि त्यानें त्याला सांगितली.

गडावर चढायला डोणगिरीच्या बाजूचा चढ खात्रीचा आहे. त्या बाजूनें वर चढायचें त्यांनीं ठरवलें.

येसा कणेकरला पुढील प्रकारें निरोप पाठवायचा ठरला–

" तूं स्वतः व तुजबरोबरचे अठ्ठेचाळीस लोक संध्या-काळीं डोणगिरीच्या बाजूला या. तुझ्या टोळीपैकीं दोघांनीं रात्रीं सूर्याजींच्या टोळीला वाटेंतच गांठून तिला दुसऱ्या बाजूनें कल्याण दरवाज्याखालीं उभे रहाण्यास सांगावें. "

तानाजी, शेलारमामा आणि जगतिसग या तिघांनाहि खात्रीनें वाटत होतें कीं आपण डोणगिरीच्या बाजूनें किल्ला चढून वर गेलों म्हणजे कल्याण दरवाजा खात्रीनं उघडतां येईल.

तो दरवाजा उघडला म्हणजे सूर्याजीबरोबर असलेले लोक सहज वर येऊं शकतील !

हा विचार सर्वांच्या मतें पक्का ठरल्यावर रायाजीनें आपल्या विश्वासांतील एका माणसाला येसाजी कणेकरला निरोप सांगण्याकरतां पाठविलें. तानाजीनें तर दिवसभरांत तोंडांत पाणीसुद्धां घातलें नव्हतें. शेलारमामानें त्याच्या जेवणाची चौकशी केली त्यावेळीं तानाजी म्हणाला, 'गड हातीं येऊन त्या सतीची सुटका होईपर्यंत तोंडांत पाणी घालायचं नाहीं असा मीं निश्चय केला आहे.'

अंधार पडल्यावर शेलारमामानें पेटाऱ्यांतून यशवंती घोरपड बाहेर काढली. ह्या घोरपडीच्या सहाय्यानें शिवाजी महाराजांनीं आणि तानाजी मालुसरे व येसाजी कंक अशा कितीतरी लोकांनीं किल्ले चढून जाऊन सर केले होते.

तिला पेटाऱ्यांतून बाहेर काढतांच तिच्या मस्तकावर शेंदराचा लेप थापला. मोत्याची जाळी तिच्या मस्तकावर घातली. पांच घटका रात्र झाली असतां येसाजी कणेकर आपल्या पन्नास लोकांना घेऊन येथें आला.

अंधारी रात्र आणि भयंकर जंगल; चिंबारी, आळवी, साग यांनीं आणि वेळूच्या बेटांनीं सगळें रान गर्द. शिवाय जनावरांचें भय; परंतु शिवाजी महाराजांचे मावळे ते. ते काय असल्या रानावनांतल्या संकटांना दाद देतात.

हां हां म्हणतां त्यांनीं वाट काढली; एक दोन ठिकाणीं एखादा दुसरा माणूस जरा अडखळून पडे; परंतु वीरश्रीनें पुनः उठून मार्गाला लागे. असें करीत करीत सुमारें सात

घटका रात्रीला डोणगिरीच्या कड्याखालच्या दरींत ते लोक येऊन उभे राहिले.

मामानें यशवंती घोरपड अंबाबाईचें नांव घेऊन सोडली परंतु त्या दिवशीं ती नेहमींप्रमाणें वर न चढतां परत माघारीं आली. तें पाहून शेलारमामाचें काळीज चर्र झालें.

शेलारमामा तानाजीला म्हणाला, 'तान्या, आज शकुन चांगला नाहीं.'

परंतु तानाजीची तर प्रतिज्ञा कीं, आजच रात्रीं बारा वाजण्याच्या आंत किल्ला सर करून त्या साध्वी कमलकुमारीला सोडवावयाची! तेव्हां त्यानें संतापानें घोरपडीच्या सांखळदंडाला एक हिसडा मारला आणि तो म्हणाला, 'यशवंते, आज कांहीं नाहीं तरी सत्तावीस किल्ले तुझ्या जोरावर लढून घेतले, आणखीं आज अशा ऐन वेळीं तूं जर दगा दिलास तर तुझं मी कसं चालूं देईन? आतां पुन्हां एकदां तुला वर लावतों. जर चांगली खबदडी पाहून बिलगलीस तर बरं आहे. नाहीं तर याच पट्ट्यानं तुझी अठरा खांडोळीं करून तीं या सगळ्या लोकांना शिळ्या भाकरीबरोबर खायला देईन.'

दुसऱ्या वेळेस यशवंती सरसर वर चढून गेली. ती एका खबदाडींत नखें रोवून पक्की बसली. प्रथम तानाजी आपला पट्टा तोंडांत धरून ढाल, धनुष्य व बाणभाता नीट सांवरून धरून हां हां म्हणतां वर जाऊन पोहोंचला. त्याच्यानंतर जगत्सिंग वर गेला. तो वर गेल्यावर त्याच्या पाठोपाठ एकामागून एक ते सर्व लोक वर चढून गेले.

सर्वजण वर पोहोंचल्यावर तानाजीनें सांगितल्याप्रमाणें ते सर्व जमिनीच्या सरपट पडून राहिले.

इतक्यांत झुंजार बुरुजाच्या बाजूनें एक पहारेकरी रजपूत शिपाई आला. त्याला डोणगिरीच्या दरींत कांहींतरी चळवळ आहे अशी शंका आली म्हणून तो त्या बाजूला तपासासाठीं आला. तानाजीच्या तें लक्षांत आल्यावांचून राहिलें नाहीं. अंधारांत माणूस दिसणें शक्य नव्हतें. पण तानाजीनें शब्दवेधाच्या ज्ञानाच्या जोरावर त्याची चाहूल कानांवर पडतांच नेम धरून तीर सोडला. तो माणूस धाडकन् खालीं पडला.

सर्व मावळे चढून आल्यावर प्रथम झुंजार दरवाजा रोखण्याचें काम तानाजीनें करण्याचें ठरविलें. झुंजार दरवाजा रोखला कीं झुंजार बुरुज ताब्यांत येणार होता. त्यानंतर दुसरें काम कल्याण दरवाजा उघडण्याचें. झुंजार बुरुजावर एक चक्री तोफ होती. ती ताब्यांत आल्यावर शत्रूचा प्रतिकार कमी पडणार होता.

तानाजीनें प्रथम आपल्या लोकांना झुंजार दरवाजाकडे नेलें. तेथील गाफील लोकांचें त्यांनीं चंदन उडविलें. दरवाजा रोखला. तेथील पहारा त्यांनीं कापून काढला.

झुंजार बुरुजावरले पहारेकरीहि मद्यपान केलेल्या अवस्थेंत गाफील होते. कोणी घोरत होते, कोणी खिदळत होते, त्यांच्यावर या करडचा मावळ्यांनीं हल्ला केला. त्यांना शस्त्रें शोधण्याला किंवा जवळची शस्त्रें उचलण्यालासुद्धां त्यांनीं संधि दिली नाहीं. तो पहाराहि त्यांनीं कापून काढला.

तोफ ताब्यांत येतांच तिच्या कान्यांत एका मावळ्यानें मेख मारून ती निकामी केली. एका जबरदस्त बुरुजाचा

असा निकाल लावून ते सारे कल्याण दरवाजाकडे निघाले.

आज माघ वद्य नवमी आहे तेव्हां आतां मध्यरात्रींच उदयभानू कमलकुमारीशीं निका लावणार आहे असें पहाऱ्यावरील प्रत्येकास वाटूं लागलें म्हणून त्यांनीं हत्यारें टाकून दिलीं होतीं. कांहींजण बालेकिल्ल्याच्या बाजूला काय काय होतें तें पहाण्यासाठीं गेले होते.

तानाजी व त्याच्या लोकांनीं कल्याण दरवाजावरील पहारा मारून दरवाजा उघडून दिला. सूर्याजी आपल्या मावळ्यांसह वर केव्हां येतो याची वाट पहात तो तिथें थांबला. कारण केवळ पन्नास मावळ्यांच्या मदतीनें दोन हजार शत्रूंवर हल्ला करणें चांगलें नाहीं हें त्यानें ओळखलें होतें.

जगत्सिंग हिंडत हिंडत बालेकिल्ल्याकडे गेला. त्याला त्याचा मित्र विशाळदेव भेटला. विशाळदेवानें किल्ल्यावरील कमलकुमारीसंबंधीची माहिती त्याला सांगितली. कमलकुमारीला बालेकिल्ल्यांतील महालांत ठेवलें आहे हें ऐकून जगत्सिंगास वाईट वाटलें. तो एकदम तेथून निघाला.

मध्यरात्रीला अजून तास–दोन तासांचा अवकाश होता. उदयभानु तितका वेळ थांबेलेच हें सांगवत नाहीं असें वाटून त्यानें तानाजीसाठीं कल्याण दरवाजाकडे धांव घेतली.

० ० ०

# ११

बालेकिल्ल्यांत कमलकुमारी रडत बसली होती. तिला कांहीं करतां येऊं नये म्हणून तिच्यावर हबशिणींचा आणि खोजांचा सतत पहारा ठेवला होता. अशा स्थितींत प्रहर रात्र होऊन चार घटका झाल्या.

मध्यरात्रीला चार घटकांचा अवकाश असतां उदयभानु आणि काजी तिच्या महालांत आले. त्यांना पहातांच कमलकुमारी भयानें थरथर कांपूं लागली.

उदयभानु तिला म्हणाला, 'कमलकुमारी, तुझा व माझा विवाह होण्याला आतां दोन–तीन घटकांचाच अवकाश राहिला आहे. आतां शोक सोड. हे काजीसाहेब आले आहेत, त्यांच्यापासून मुसलमानी धर्माची दीक्षा घे म्हणजे लागलीच आपण निका लावून टाकूं.'

त्याचें म्हणणें ऐकल्यावर कांहीं वेळ तिच्या तोंडांतून शब्दहि बाहेर पडला नाहीं. त्यानें तिच्या अंगाला हात लावण्यासाठीं आपला हात पुढें केला त्यासरशीं तिचें नष्ट धैर्य परत येऊन ती चटकन् उद्गारली, 'तुझा तो दुष्ट हात मी आपल्या अंगाला लागूं देण्यापूर्वीं प्राण देईन.'

तिचा तो आवेश आणि ते शब्द ऐकून उदयभानु दचकून मागें सरला. काजीनें तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. उदयभानूनें तिला तिचे पिताजी स्वर्गवासी झाल्याची वार्ता सांगितली आणि आतां तुला माझ्याशिवाय दुसरा कोणीहि मालक नाहीं असें म्हणून तो निर्धारानें पुढें झाला.

त्यानें तिला आपल्या हातांनीं उठविण्यासाठीं हात पुढें केले त्याचवेळीं त्याच्या कानीं 'तोबा, तोबा' असा आवाज पडला !

एक रजपूत शिपाई त्या ठिकाणीं आला. त्यानें मराठे किल्ल्यावर आले आहेत आणि त्यांनीं लोकांना ठार करायला सुरुवात केली आहे ही वार्ता त्याला सांगितली.

'आपल्या सैनिकांपैकीं कांहींनीं कड्याखालीं उड्या टाकल्या. कांहींनी खालचा रस्ता धरला. आतां आपण स्वतः येऊनच कांहीं झालें तर होईल. नाहीं तर आपण मेलों आणि किल्ला गेला.'

त्याची ही वार्ता ऐकून उदयभानु त्याच्यावर ओरडला. आपल्या आनंदाच्यावेळीं विघ्न आलेलें त्याला आवडलें नाहीं. तो काजीला निका लावण्यासाठीं सांगत असतांच गलका वाढला.

संतापानें त्यानें तलवार उपसली. तो तिथून बाहेर पडला. जिकडे तिकडे धांवाधांव, पळापळ आणि आरडाओरड.

बालेकिल्ल्याच्या सभोंवतालीं मंडळींची नुसती दाटी आणि जिकडून तिकडून मराठ्यांचा 'हरहर महादेव' या

रणगर्जनेचा प्रचंड ध्वनि! अंधारामुळें धड कांहीं दिसेना म्हणून बालेकिल्ल्यांतल्या लोकांस पलिते पेटविण्याचा त्यानें हुकूम केला.

आपला घात झाला असें पाहून त्यानें एकच गर्जना करून आपल्या रजपूत शिपायांस धीर दिला व आपला पट्टा फिरवीत तो बालेकिल्ल्यावरून खालीं आला, नव्हे त्यानें उडी टाकली म्हटलें तरी विशेष शोभेल. कमलकुमारीच्या महालांत त्याला ही हाहाःकाराची बातमी देणारा रजपूत शिपाई त्याच्या-मागें क्षणभर उभा राहिला, आणि 'कमलकुमारी, तूं भिऊं नकोस. तुझी सुटका झाली. मी तुझ्या मैत्रिणीला सोडविण्याला जातों.' असें म्हणून उदयभानूच्या पाठोपाठ तो निघाला.

कमलकुमारीनें त्याचा आवाज ओळखला. आणि तित-क्यांत आनंदानें वर पाहिलें तों तो तर कोणीकडे गेलाच; परंतु तिचा छळ करणाराहि तिच्या समोर नाहीं, आणि काजी-साहेब तर अगदीं भिऊन जाऊन एका कोंपऱ्यांत स्वस्थ बसले आहेत!

तानाजीनें कल्याण दरवाजावर सूर्याजीच्या तुकडीची बराच वेळ वाट पाहिली, परंतु ती लवकर आली नाहीं, तेव्हां आपल्या शेलक्या लोकांनिशींच बालेकिल्ल्यापर्यंत मार्ग काढून हल्ला करण्याचें धाडस त्यानें आरंभिलें. त्याच्याबरोबर जगत्-सिंग होताच. म्हाताऱ्या शेलारमामानें तर या रात्रीं कमालच करून सोडली.

असा त्याचा तडाखा सुरू झाल्यावर थोडक्याच वेळांत रजपूत शिपाई सावध होऊन त्यांनीं आपलीं शस्त्रें सांवरलीं

आणि चकमकीस सुरुवात झाली. शूर तानाजीनें पुढें होऊन बालेकिल्ल्यापर्यंत शत्रूस हाणीत नेलें.

इतक्यांत जगत्‌सिंगानें तर किल्ल्याच्या आंत जाऊन सर्व शिपायांना घावरवून सोडलें. ' उदयभानु कुठं आहे, त्याला वर्दी दिली पाहिजे, किल्ला काफरांनीं सफा केला. तोबा तोबा, हे मराठे नाहींत, सैतान आहेत. ' असें म्हणत म्हणत कमल-कुमारीला ठेवलेल्या महालांत त्यानें आपला शिरकाव करून घेऊन ऐनवेळीं उदयभानूला घाबरविण्यासारखी वर्दी देऊन त्याच्या रंगाचा बेरंग केला व आपण त्याच्या मागोमाग बाहेर पडला.

उदयभानूस वर्दी देणारा जगत्‌सिंगच होय ! तो उदय-भानूच्या मागोमाग बाहेर पडला तो सरळ देवलदेवीला ज्या महालांत ठेविलें होतें त्या महालाकडे जाण्यास निघाला, तों त्याला तिकडे जाण्यास कोठेंच वाव दिसेना.

आतां सूर्याजीची टोळी वर येऊन दाखल झाली होती. रजपूतहि सावध झाले होते आणि बालेकिल्ल्याच्या भोंवतालच्या पटांगणांत एकच धुमश्चक्री सुरू झाली होती. मनुष्याशीं मनुष्य भिडून लढाई चालली होती, तलवारीवर तलवारी वाजत होत्या, बाणांचे सूं सूं असे आवाज निघत होते.

कित्येक रजपुतांच्या डाव्या हातांत पलिते आणि उजव्या हातांत तलवारी होत्या. ते तसेंच लढण्याचा प्रयत्न करीत होते, त्यांस अंधुक उजेडांत लढतां येईना, त्यामुळें त्यांस हिलाल लागले ! अर्थात त्यांचे एकेक हात गुंतून राहिले, आणि या हिलालांच्या उजेडाचा उपयोग मराठ्यांस मात्र चांगला झाला.

इतक्यांत बालेकिल्ल्याच्या व कल्याण दरवाजामध्यें भैरवाच्या देवळाजवळ खुद्द उदयभानूची व तानाजीची चकमक उडून राहिली. दोघेहि अगदीं शिकस्तीनें लढताहेत असें जगत्सिंगाच्या दृष्टीस पडलें. तानाजी व उदयभानु दोघेहि विलक्षण लढवय्ये, तेव्हां त्यांचें तें युद्ध पाहून त्या तसल्या वेळीहि जगत्सिंगास अत्यंत आश्चर्य वाटून तो जरा जागच्याजागीं उभा राहिला.

विजेचा चमचमाट जसा क्षणभर दिसायचा, तसे त्यांचे तलवारीचे हात चालले होते. ढालीवर कचाकच आवाज होत होते. आजूबाजूलाहि लोकांच्या अशाच चकमकी चालल्या होत्या. दोन्हीकडची मंडळी आपापल्या परीनें आपापल्या लोकांना उत्तेजन देत होती व शत्रूवर घाव घालीत असतांना तोंडानें कांहींतरी उत्साह उत्पन्न करणारे शब्द निघतच होते.

तानाजी व उदयभानु यांची तर परस्परांना चीत करण्याची अगदीं अशी स्पर्धा चालली होती कीं कांहीं विचारूं नये. नाटकांतील वीराप्रमाणें ते एकमेकांना व्याख्यानें देऊन शब्दांची वृष्टि करीत नव्हते, तर आपल्या वरच्या दांतांनीं खालचे किंवा खालच्या दांतांनीं वरचे ओंठ चावून मनगटांत जितका जोर असेल तितक्या जोरानें व अंगीं जितकी कुशलता असेल तितक्या कुशलतेनें आपल्या हातांतल्या खड्गांनीं एकमेकांस चीत करण्यास झटपटत होते.

दोघांनाहि पांच पांच–सात सात वार लागून दोघांच्याहि अंगांतून रक्ताच्या धारा चालल्या होत्या. इतक्यांत उदयभानूचा एक वार– फार जोराचा वार– तानाजीच्या

ढालीवर लागून त्यामुळें ती पार तुटून जाऊन त्यास टाकावी लागली. आयत्यावेळीं दुसरी ढाल कोठली येते ? तेव्हां त्यानें उजव्या हातानें पट्टा फिरवून शत्रूचा मार चुकवितांचुकवितां कमरेचा शेला डाव्या हातानें सोडून व तोच हाताला गुंडाळून घेऊन त्या हाताची ढाल केली, परंतु तशानें कसा निभाव लागणार ?

उदयभानूनें तर शत्रूच्या संकटाचा पूर्ण फायदा घेण्यासाठीं आपल्याकडून शिकस्त केली, पण त्यास लवकर यश आलें नाहीं. थोडयाच वेळांत तानाजी पडतो असें जगत्सिंगास वाटलें, उदयभानूचा दम ताजा. तानाजी कांहीं नाहीं तरी प्रहरभर एकसारखा जिवापाड लढतच होता. त्याच्या मदतीला आपण गेलेंच पाहिजे, असें म्हणून जगत्सिंग आपल्या जाण्याची दिशा बदलून त्या दोघांची चकमक चालली होती तेथें जाण्याचा मार्ग काढूं लागला.

इतक्यांत तानाजीच्या उजव्याहि हाताच्या कोंपऱ्याच्या खालच्या बाजूस उदयभानूचा एक वार बसून त्याचा तो तलवारीचा हात पार उडून गेला.

तो हात उडाला असें पहातांच उदयभानूनें आणखी एक वार त्याच्या कंठाजवळ मारून त्यास खालीं पाडलें व लागलीच तिसरा वार त्याच्या छातींत मारला. तो वर्मी लागला व तानाजीनें 'हाय ! महाराज ! ही आजची आपली सेवा शेवटास जाईल असं वाटलं होतं; पण नाहीं, आजच आपल्या सेवेचा ऋणानुबंध संपला ! देवाची इच्छा !' इतकेच शेवटले शब्द बोलून प्राण सोडला.

आपल्या प्रतिपक्षाला मारल्यानें उदयभानूची तृप्ति झाली नाहीं. इतका वेळ गप्प असलेल्या तोंडानें त्यास अपशब्द बोलून त्याच्या पवित्र शवाला लाथेची ठोकर मारावी अशी त्या दुष्टाला इच्छा झाली आणि ' काफिर जा, नरकुंडांत जा. सैतानाच्या राज्यांत जा. आणखी मी तुला तिथं धाडला असं सांग. ' असें त्यानें मोठ्यानें म्हणून तो आपली लाथ उचलून त्या शवास ठोकर देणार तोंच त्याच्या त्या पायाचा तुकडा पडला व त्याच्या कानांवर पुढील शब्द पडले,

' अरे दुष्टा, रजपुताच्या कुळांत येऊन किती प्रकारचीं नीच कृत्यें करशील ? समरांगणांत समोरासमोर उभा राहून चार घटका ज्याच्याशीं बरोबरीनं झुंजलास तो मरून पडल्यावर त्याच्या शवाला वंदन करायचं सोडून लाथ मारायला पाय पुढं करतोस ? आतां असं इकडे तोंड फिरव. पाहूं दे तुझं शौर्य. '

हे शब्द ऐकल्यावरोबर उदयभानु वर पाहूं लागला; तो बोलणारा माणूस ओळखीचा वाटेना. जातीचा तर रजपूत, कारण तो अस्सल मेवाडी भाषेंतच बोलला. मराठ्यांच्यातर्फे हा रजपूत लढणारा आणि इतक्या अभिमानानें त्यांचा पक्ष घेणारा हा कोण, त्याचा त्यास कांहींच तर्क होईना. कारण जगत्सिंगास त्यानें कधींच पाहिलें नव्हतें.

त्याची समजूत अशी झाली कीं आपल्या सैन्यापैकींच कोणीतरी आपला द्वेष करणारा आपला शिपाई फितूर होऊन आपल्यावर यावेळीं सूड घेण्याला आला आहे. तेव्हां संतापून तो शिव्या देऊं लागला.

जगत्सिंग त्या ऐकून नुसता हंसून म्हणतो, ' उदयभानु, तुझा पराक्रम म्हणजे शिव्या देण्यांत आणि कोणी साध्वी स्त्रिया सती जात असल्या तर त्यांना अडवून त्यांच्या पातिव्रत्याचा भंग करण्यांतच असेलसं वाटत नव्हतं. पण तें तसंच आहे असा आज अनुभव आला. मग ती तलवार तरी कशाला हातांत धरतोस ? देईनास फेंकून ?'

जगत्सिंगाचे हें उपरोधिक बोलणें त्याला सहन झालें नाहीं. त्यानें त्याच्यावर तलवार चालविली. तो सावध होता. त्यामुळें त्यानें तो हात ढालीवर झेलून आपला बचाव केला.

० ० ०

# १२

तानाजी पडल्याची बातमी वणव्याप्रमाणें सर्वत्र पसरली. उदयभानु आणि जगत्सिंगाची चकमक जिथें चालली होती त्या ठिकाणीं शेलारमामा आला. त्यानें उदयभानूशीं दोन हात करायचें ठरवलें. जगत्सिंगाला त्यानें दूर व्हायला सांगितलें आणि शेलरमामाची आणि उदयभानूची तलवारीची हातघाई सुरू झाली.

सूर्याजी तिकडे लढण्याची शिकस्त करीत होता. त्यानें एकसारखी कापाकापी चालवली होती. तानाजी पडल्याची वार्ता समजल्यामुळें कांहीं मावळे पळूं लागले होते. त्यांनीं दोरावरून खालीं उतरूं नये, म्हणून सूर्याजीनें दोर कापून टाकला.

पळणाऱ्या शिपायांना उद्देशून तो म्हणाला, ' अरे षंढांनो, जा मरा, कड्यावरून उड्या टाकून मरायचं असेल तर मरा, मीं दोर कापून टाकले आहेत. तुमचा बाप तिथं मरून पडला आहे; त्याला महारांच्या हातून कुत्र्याची मोहोती मिळेल याचा मात्र विचार करा.'

या त्याच्या हृदयभेदक शब्दांनीं पळणारे मावळे लढूं लागले. शेलारमामानेंहि लोकांना उत्तेजन दिलें.

उदयभानूशीं तलवारीनें शेलारमामा लढत असतां त्याच्या हातांतील पट्ट्याचा एक कचका त्याच्या कानशिलावर बसला. त्यामुळें तेथील त्याच्या शिरा तत्काळ तुटल्या. तो उलथून पडला. उदयभानु पडल्याची वार्ता सर्वत्र लगेच पसरली.

मराठ्यांची सरशी झाली. सूर्याजीनें जगत्सिंगाकडून द्वाही फिरविली कीं जो कोणी शस्त्र टाकून स्वस्थ बसेल त्यास कांहीं दुखापत केली जाणार नाहीं. त्यामुळें मोंगलांच्या सैन्यानें भराभर शस्त्रें आणून त्यांच्यापुढें टाकलीं व रुमालांनीं हात बांधले.

गड काबीज झाला. शिवाजीमहाराजांस ही वर्दी लागावी म्हणून शेलारमामानें येसाजी कणेकरास सांगून बागेंतील एका

गवताच्या गंजीला आग लावून दिली.

तिकडे गडावर शिवाजीमहाराज तानाजीकडून कांहीं वार्ता न आल्यानें चिंतेंत होते. तो कांहींतरी संकटांत असावा असें त्यांना वाटूं लागलें होतें. म्हणून ते निवडक सैन्यानिशीं रायगड सोडून कोंडाण्याकडे निघाले. ते स्वतः आपल्या आवडत्या कृष्णा घोडीवर स्वार झाले. सोळा घटका रात्रीला त्यांनीं रायगड सोडला.

रायगडापासून कोंडाणा फार फार तर बारा–तेरा मैल आहे. साधारण अर्ध्या वाटेवर मंडळी आली त्यावेळीं सैन्यांतील एक बारगीर मोठ्यानें म्हणाला, 'महाराज, कोंडाण्यावर उगवत्या बाजूला ती पहा आग दिसते आहे.'

महाराजांनीं त्या दिशेला पाहिलें. त्या जाळाचा अर्थ त्यांना लगेच समजला. आपला जय झाला हें त्यांनीं ओळखलें.

अखेरीस स्वाऱ्या कोंडाण्याकडे निघाल्या. कल्याण गांवाजवळ जातांच त्यांना लोक घाबरलेले दिसले. गडावरच्या उलटसुलट बातम्या त्यांना त्या गांवांत ऐकायला मिळाल्या.

अखेरीस ते किल्ल्याच्या पायथ्याशीं पोहोंचले. तेथें मोंगलांच्याऐवजीं मराठ्यांचा पहारा त्यांना दिसला. पहाऱ्यावरील लोकांनीं त्यांना पहातांच खडी ताजीम दिली. जय मिळाल्याची कळा कोणाच्याहि चेहऱ्यावर त्यांना दिसेना. त्यांचा डावा डोळाहि वेगानें लवूं लागला.

अखेरीस ते गडावर पोहोंचले. सर्वत्र रक्ताचा शिपडा व प्रेतांचा खच त्यांना दिसला.

ते राजमहालाच्या जवळ पोहोंचले. तेथें त्यांना सूर्याजी व शेलारमामा दु:खी चेहऱ्यानें बसलेले दिसले. त्यांच्या जवळच तानाजीचें प्रेत शेल्यानें झांकलेलें त्यांच्या नजरेला पडलें. त्यांना पहातांच शेलारमामा दु:खानें उद्गारला, 'महाराज, माझा तानाजी गेला हो ! आपला तानाजी गेला हो !'

शिवाजीमहाराजांना दु:ख अनावर झालें. त्यांनीं शेलार-मामाला कवटाळलें. त्यांच्या डोळ्यांतून आंसवें ओघळूं लागलीं.

थोड्या वेळानें त्यांनीं डोक्याचा टोप व तुरा खोंवलेला पटका उतरून टाकला. अंगावरील पांढरा शेला त्यांनीं डोक्यास गुंडाळला. पायांतील जोडे काढून ते तानाजीच्या प्रेताजवळ गेले.

त्याच्या अंगावरील शेला आपल्या हातांनें दूर करून कितीतरी वेळ ते त्याच्या आकाशाकडील लागलेल्या दृष्टीकडे एकसारखे पहात राहिले. पुन्हां त्यांच्या डोळ्यांतून गंगायमुना वाहूं लागल्या.

कांहीं वेळानें सूर्याजीकडे वळून, डोळे पुशीत ते उद्गारले, 'सूर्याजी, गड आला, पण माझा सिंह गेला अं ! मामा, मी आपलं समाधान कसं करूं? मामा, शिवाजी मेला आणि तानाजी आहे असं तुम्ही आणि सूर्याजी समजा. जानकीअक्का-लाहि माझा तसाच निरोप सांगा; तिला म्हणावं जसा माझा शंभू आणि राजाराम तसाच तिसरा रायबा !'

शिवाजीमहाराज तानाजीच्या प्रेताजवळ गेले तेव्हां जगत्सिंग तेथें नव्हता. तो राजमहालांत आपल्या पत्नीच्या प्रेताजवळ बसून शोक करीत होता. कमलकुमारीहि आपल्या मैत्रिणीच्या प्रेताजवळ बसून दु:ख करीत होती. तिनें ओढणीचा गळफांस लावून आत्महत्त्या केली होती.

जगत्सिंगानें शिवाजी महाराजांकडून कमलकुमारीला सती जाण्याची परवानगी मिळवली. बाळाजीनें कल्याणहून भिक्षुक आणून, तिला मंत्र म्हणून अग्निप्रवेश करण्याची जड अंत:करणानें परवानगी दिली.

तिनें आपल्या मैत्रिणीविषयीं शोक करून, धर्मशिळेवर उभें राहून आणि पतीच्या पादुका बरोबर घेऊन सती जाण्याची तयारी केली.

शिवाजीमहाराजांनीं प्रथम तिच्या पायांवर डोकें ठेवलें. सर्वांनीं त्यांचें अनुकरण केलें. महाराजांना आशीर्वाद देऊन तिनें चिताप्रवेश केला.

त्या गर्दींत जगत्सिंग कोठें नाहींसा झाला तें कळलें नाहीं. उदयभानूच्या जनान्यास रजपूत शिपाई बरोबर देऊन महाराजांनीं तो दिल्लीकडे रवाना केला.

ज्या दरींतून तानाजी वर चढून आला ती पुन्हां कोणास चढून येण्यास उपयोगी पडूं नये म्हणून तिथें तटबंदी करण्याचा हुकूम महाराजांनीं दिला.

त्यावेळीं बाळाजी आवजी हात जोडून त्यांना म्हणाला, ‘ तटबंदी तर आपल्या हुकुमावरून होईलच, पण तानाजीराव पडले तिथं त्यांची समाधि बांधावी, असं मंडळींच्या मनांत आहे. महाराजांनीं हुकूम द्यावा. ’

‘ जरूर, जरूर ! ’ महाराज मोठ्यानें म्हणतात, ‘ पण चिटणीस, या चुन्याच्या दगडाच्या समाधीनं तानाजीला काय होणार ? त्याची खरी समाधि माझ्या आणि लोकांच्या हृदयांत आहे ! ’

**— समाप्त —**

IRBK-0102149

IRBK-0102149



# हरि नारायण आपटे

जन्म : ८–३–१८६४

मृत्यु : ३–३–१९१९

वयाच्या चौथ्या वर्षीं मातेचं मरण. काका काकींकडून संगोपन. वडील सरकारी नोकर तर काका चिमणाजी वकील. प्रारंभिक शिक्षण मुंबईस. काकांनीं पुण्याला बिऱ्हाड केलं म्हणून पुण्याच्या न्यू इंग्लिश स्कूलमधून मॅट्रिक. गणित कच्चं व तें कॉलेजांत सक्तीचं असल्यानं कॉलेजशिक्षण अर्धवट सोडलं, पण भाषेची आवड असल्यानं संस्कृत, फ्रेंच, जर्मन या भाषा शिकून त्यांतील उत्तम ग्रंथ वाचले. १८९० सालीं 'करमणूक' नांवाचं पत्र विचारजागृतीसाठीं त्यांनीं काढलं. तें २८ वर्षं चालविलं. याद्वारा त्यांनीं स्वभाषा व स्वदेशाची सेवा केली. या पत्रांतून त्यांनीं अठरा कादंबऱ्या लिहिल्या. त्यांपैकीं आठ सामाजिक आणि दहा ऐतिहासिक आहेत. पस्तीस वर्षं त्यांनीं लेखनकार्य केलं. ते पुण्यांतील त्यावेळचे एक प्रमुख पुढारी होते. पुणें म्युनिसिपालिटीचे ते एकदां अध्यक्ष झाले होते. मराठी भाषेचे 'आद्य कादंबरीकार' म्हणून ते आतां सर्वत्र ओळखले जात आहेत.

★